cmyk

## संपादकीय

### न्यायदानात राजकीय अडथळेच अधिक

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने आयोजित कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सुरक्षेच्या मुद्द्यांवर भाष्य केले. आजच्या काळात महिलांवरील अत्याचार मुलांची सुरक्षा हे विषय समाजासाठी गंभीर चिंतेचे ठरत आहेत. कठोर कायदे केले असले तरी ते अधिक सक्रिय झाले पाहिजेत. महिला अत्याचार प्रकरणांत लवकरात लवकर न्याय मिळायला हवा असे मत पंतप्रधानांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीत व्यक्त केले.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com **नवी दिशा... नवे विचार.....** email:rajyaloktantra75@gmail.com


### जम्मू-काश्मीर विधानसभेसाठी काँग्रेसची दुसरी यादी जाहीर

नवी दिल्लीः जम्मू-काश्मीरमधील आगामी विधानसभा निवडणुकीसाठी उमेदवारांची नावे निश्चित करण्यासाठी काँग्रेसच्या केंद्रीय निवडणूक समितीची सोमवारी बैठक झाली. या बैठकीला काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे, लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यासह नेते उपस्थित होते. बैठकीनंतर उमेदवारांची दुसरी यादी जाहीर करण्यात आली. विधानसभा निवडणुकीत काँग्रेसने जम्मू-काश्मीरचे प्रदेशाध्यक्ष तारिक हमीद कारा यांना मध्य शालतेंग मतदारसंघातून तिकीट दिले. तर रियासीमधून मुमताज खान यांना उमेदवारी देण्यात आली. भूपेंद्र जामवाल यांना श्री माता वैष्णव देवी येथून तिकीट देण्यात आले.

बीड - महाराष्ट्र | वर्ष - ४ | अंक-१३३ | मंगळवार दि.०३ सप्टेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | • पाने- ६ | किंमत ३ रूपये

# कापूस, सोयाबीन अनुदान १० सप्टेंबरपासून शेतकऱ्यांच्या खात्यात

## अडचणी सोडवून तातडीने अनुदान देण्याच्या कृषिमंत्र्यांच्या सूचना

**मुंबई | प्रतिनिधी**

**कापूस आणि सोयाबीन अनुदानाची वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी आनंदाची बातमी आहे. हे अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात १० सप्टेंबरपासून जमा करा, अशा सूचना कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी केल्या आहेत. अनुदान वाटपात येणाऱ्या अडचणी तातडीने सोडवून शेतकऱ्यांना अनुदान देण्यासाठी त्यांनी विशेष बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी या सूचना केल्या. मात्र पात्र शेतकऱ्यांच्या नावाचा घोळ अजूनही कायम आहे.**





कापूस आणि सोयाबीन उत्पादकांना अनुदान देण्याची कार्यपध्दती शासनाने ३० ऑगस्ट रोजी जाहीर केली होती. पण तरीही अडचणी कायम आहेत. अनुदान वाटपात येणाऱ्या या अडचण सोडविण्यासाठी कृषिमंभी धनंजय मुंडे यांनी आढावा बैठक घेतली होती. या बैठकिला कृषी विभागाच्या सचिव जयश्री भोज, कृषी आयुक्त रविंद्र बिनवडे, कृषी संचालक विजयकुमार आवटे, माहिती व तंत्रज्ञान विभागाचे अधिकारी आणि कृषी विभागाचे संबंधित अधिकारी उपस्थित होते. २०२३ च्या खरीप हंगामातील कापूस व सोयाबीन पीक घेतलेल्या शेतकऱ्यांना सरकारने २ हेक्टरच्या मर्यादेत हेक्टरी ५ हजार रुपये अनुदान जाहीर केले होते. त्यासाठी राज्यातील शेतकऱ्यांना ४ हजार १९४ कोटी रुपये मंजूर करण्यात आले. यामध्ये कापूस उत्पादक शेतकऱ्यांसाठी १ हजार ५४८ कोटी रुपये आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांसाठी २ हजार ६४६ कोटी रुपये असे एकूण ४ हजार१९४ कोटी रुपये अर्थसहाय मंजूर करण्यात आले आहेत.

कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी या बैठकीत कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांच्या अर्थ सहाय्य वाटपात येणाऱ्या तांत्रिक अडचणी या महाआयटी व महसूल विभागाच्या ◀◀ पान २ वर

### हेक्टरनुसार मिळणार अनुदानाचे पैसे

राज्य सरकारने सोयाबीन कापूस उत्पादकांना प्रतिहेक्टरी ५ हजार रुपये अनुदान देण्याबाबत कार्यपद्धती नुकतीच निश्चित केली. एका शेतकऱ्यांच्या नावावर २ हेक्टर सोयाबीन आणि २ हेक्टर कापूस क्षेत्र असेल तर एकूण ४ हेक्टर क्षेत्रासाठी २ हेक्टरच्या मर्यादेत एकूण क्षेत्रासाठी २० हजार रुपये देण्यात येणार आहेत. म्हणजेच लाभार्थी शेतकऱ्यांकडे २ हेक्टर कापूस आणि १ हेक्टर सोयाबीन असेल तर अशा लाभार्थी शेतकऱ्यांना १५ हजार रुपये तर १ हेक्टर सोयाबीन आणि १ हेक्टर कापूस असेल तर १० हजार रुपये अनुदान देण्याबाबत शासन निर्णयात स्पष्ट करण्यात आले आहे.

# कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी जन्मगावी केला बैलपोळा साजरा



**परळी | प्रतिनिधी**

**राज्याचे कृषिमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी आपले जन्मगाव नाथरा ता. परळी वै. येथे सोमवारी बैलपोळ्या निमित्त उपस्थित राहून आपल्या शेतातील बैल जोड्यांचे कुटुंबीयांसमवेत पारंपरिक पद्धतीने पूजन केले व बैल जोड्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवला.**

मराठवाड्यात बैलांची पूजा करताना एक खास गीत म्हटले जाते, ''चाहुर चाहुर चांग भलं, पाऊस आला घरला चला'' अशा आशयाचे हे ग्रामीण गीत बैलजोड्यांचे ◀◀ पान २ वर

## साहेबराव दरेकर नाना यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यास उपस्थित राहण्याचे आवाहन

**आष्टी | प्रतिनिधी**



**आष्टी मतदार संघाच्या राजकारणात व समाजकारणात गेली चाळीस वर्षापासून जनतेची प्रश्न सोडवणारे,आष्टीच्या राजकीय कुरुक्षेत्रावरील भीष्म पितामह माजी आमदार साहेबराव दरेकर यांचा अभिष्टचिंतन सोहळा मंगळवार दिनांक ३ सप्टेंबर रोजी नगर बीड रोडवरील शेरी बुद्रुक येथील अंबिका लॉन्स येथे दुपारी साडेबारा वाजता होणार आहे.तरी या सोहळ्यास मतदारसंघातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार गटाचे आष्टी तालुका अध्यक्ष परमेश्वर शेळके यांनी केले आहे.**

या अभिष्टचिंतन सोहळ्यास खासदार बजरंग सोनवणे, अहमदनगरचे खासदार निलेश लंके, ◀◀ पान २ वर



**आष्टीः बैलपोळा सणाच्या निमित्ताने माजीमंत्री सुरेश धस यांनी सपत्नीक बैलांची विधिवत पूजा करत त्यांना पुरणपोळीचा नैवेद्य भरवत बळीराजाला पौळ्याच्या शुभेच्छा दिल्या..**

# डॉ.योगेश क्षीरसागरांनी बीड शहरातील नदीपात्रालगत भागाचा घेतला आढावा



**बीड | प्रतिनिधी**

**शहरातील चांदणी चौक परिसरातील दगडी पुलासह नदीपात्राजवळील भागात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी सोमवारी (दि.२) सकाळी ११ वाजता भेट दिली. यावेळी स्थानिक नागरिकांशी संवाद साधत पुरसदृश्य परिस्थितीचा आढावा घेतला.**

गत ४८ तासापासून जिल्हाभरात संततधार पाऊस सुरू आहे. बिंदुसरा नदीपात्राजवळील भागाला पुराचा धोका निर्माण झालेला आहे. याबाबत नगरपरिषद प्रशासनाशी संवाद साधत आपत्कालीन व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच, त्यांना नागरिकांच्या संपर्कात राहण्याच्या सूचना दिल्या. यावेळी ज्येष्ठ नेते सादेक जमा, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अल्पसंख्याक सेलचे जिल्हाध्यक्ष इक्बाल शेख, युवती जिल्हाध्यक्ष प्रिया डोईफोडे, सय्यद इलियास, बिभीषण लांडगे, सरपंच अमोल बागलाने, अशोक वाघमारे, विनोद हातागळे, माजेद कुरेशी, साजेद जागीरदार, ए.वन.मुजीब, अमर विद्यागर, शुभम कुलथे, राहुल शिंदे, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते. याप्रसंगी नगरपरिषदेचे कर्मचारी, पोलीस अधिकारी उपस्थित होते.

## आयकर कायद्या संदर्भात सीबीडीटीची समिती

**नवी दिल्ली | वृतसंस्था**

१९६१ च्या आयकर कायद्याचे पुनरावलोकन करण्यासाठी केंद्रीय प्रत्यक्ष कर मंडळ अंतर्गत अंतर्गत समिती स्थापन करण्यात आली आहे. ही समिती आयकर विभागाचे मुख्य आयुक्त व्ही के गुप्ता यांच्या नेतृत्वाखाली काम करणार आहे.

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी त्यांच्या जुलै २०२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणात या समितीच्या स्थापनेची घोषणा केली होती आणि सहा महिन्यांत पुनरावलोकन प्रक्रिया पूर्ण केली जाईल यावर जोर दिला होता. प्राथमिक उद्दिष्ट हा कायदा सुलभ करणे, तो अधिक संक्षिप्त, ◀◀ पान २ वर

# अतिवृष्टीच्या अनुषंगाने आ.संदीप क्षीरसागरांच्या प्रशासनाला सूचना

## जिल्हाधिकारी, रस्ते विकास महामंडळ, नगरपरिषद मुख्याधिकाऱ्यांकडे केला पत्रव्यवहार

**बीड | प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यात सध्या सर्वत्र पाऊस सुरु असून सर्व ठिकाणी अतिवृष्टीची नोंद झाली आहे.



गेल्या तीन ते चार दिवसांपासून बीड जिल्ह्यात पावसाची संततधार सुरु आहे. त्यामुळे जनजीवन विस्कळीत झाले असून अनेक अडचणी निर्माण झाले आहेत. तसेच या अनुषंगाने काळजी घेण्याची गरज असल्याने आ.संदीप क्षीरसागर यांनी प्रशासनाला सूचना दिल्या असून याबाबत जिल्हाधिकारी, महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळाचे कार्यकारी अभियंता व बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांच्याकडे पत्रव्यवहार केला आहे.

बीड तालुक्यातील कपिलधारवाडी येथे भूस्खलनाचा होण्याचा धोका आहे. सदरील गावात ८० ते ८५ कुटुंबे असून ५०० ते ६०० लोक ◀◀ पान २ वर

### सर्व पिकांची सरसकट नुकसान भरपाई द्या

बीड विधानसभा मतदारसंघ क्षेत्रासह जिल्ह्यातील सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली आहे. सलग तीन-चार दिवस पावसाची संततधार असल्याने शेतातील सर्वच पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. सातत्याच्या आस्मानी संकटाने शेतकरी घाईला आला आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ पंचनामे करून सर्व पिकांना सरसकट नुकसान भरपाई मिळण्याकरिता प्रशासकीय स्तरावर कार्यवाही करावी अशी मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी केली आहे.

# शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी १४ हजार कोटींच्या ७ योजनांना मंजुरी

**नवी दिल्ली | वृतसंस्था**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत देशातील बळीराजाला समृद्ध करण्यासाठी ७ मोठे निर्णय घेण्यात आले. या निर्णयाच्या अंमलबजावणीसाठी १३ हजार ९६६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी देण्यात आली आहे. यासोबतच महाराष्ट्राला नवीन रेल्वे मार्गाची भेटही देण्यात आली आहे. मनमाड-इंदूर नवीन रेल्वे मार्गाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. यासाठी १८ हजार ३६ कोटी रुपये खर्च अपेक्षित आहे.

केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितले की, केंद्र सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.३१ ऑगस्ट २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू : १.५० क्विंटल | २,६२१ | २,६२१ | २,६२१ |
| ज्वारी/हायब्रिड : ३४.०० क्विंटल | २,२०० | २,५६० | २,३५१ |
| मूग : ५१.५० क्विंटल | ६,३०० | ८,२६१ | ७,६९० |
| तूर : १.०० क्विंटल | ८,५०० | ८,५०० | ८,५०० |
| उडीद : ३२.०० क्विंटल | ७,१०० | ८,११० | ७,६८२ |
| बाजरी:४.००क्विंटल | २,३७० | २,५९२ | २,४८१ |
| चिंच/लोकलः २०.०० क्विंटल | १,१०० | ३,५५० | २,३२५ |
| सोयाबीनः १५.०० क्विंटल | ४,५०० | ४,५०० | ४,५०० |
| हरभराः ०.५० क्विंटल | ६,४०० | ६,४०० | ६,४०० |

# सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी

## शेतीपिकांचे पंचनामे करण्याचे जिल्हाधिकाऱ्यांच्या आवाहन

**बीड | प्रतिनिधी**



**सततच्या पावसामुळे नागरीकांनी काळजी घ्यावी तर झालेल्या शेती पिकांचे पंचनामे प्रशासनातर्फे तातडीने व्हावे, असे आवाहन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी प्रसिद्धी पत्रकाव्दारे केले आहे.**

जिल्ह्यात यावर्षी आतापर्यंत वार्षिक सरासरीच्या ११५.८ टक्के इतका पाऊस झालेला ◀◀ पान २ वर

# आरोपीसाठी घरावर बुलडोझर चालवू शकत नाही


## सर्वोच्च न्यायालयाचा मोठा निर्णय, देशांतर्गत मार्गदर्शक तत्वे लागू करू

**नवी दिल्ली | वृतसंस्था**

**मागील काही दिवसांपासून देशातील विविध राज्यांमध्ये आरोपीवरील कारवाईचा भाग म्हणून घरे, दुकाने यांच्यावर राज्य सरकारकडून बुलडोझर चालविण्यात येत आहे. तसेच या कृतीचे समर्थनही राज्य सरकारकडून करण्यात येत आहे. यापार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी अनेक राज्यांतील अधिकारी दंडात्मक कारवाई म्हणून गुन्ह्यांचा आरोप असलेल्या व्यक्तींची घरे पाडण्याचा अवलंब करत असल्याच्या चिंतेचे निराकरण करण्यासाठी संपूर्ण भारतातील मार्गदर्शक तत्त्वे मांडण्याचा मानस व्यक्त केला.**



बुलडोजर वापरण्याप्रश्नी न्यायमूर्ती बी आर गवई आणि के व्ही विश्वनाथन यांचा समावेश असलेल्या द्विसदस्यीय खंडपीठाने, विविध राज्यांमधील ''बुलडोझर कृती'' ला आव्हान देणाऱ्या याचिकांच्या तुकडीवर सुनावणी करताना, पक्षांना संपूर्ण भारतात मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्यासाठी न्यायालय विचारात घेतलेल्या मसुदा सूचना सादर करण्यास सांगितले. तसेच हे प्रस्ताव ज्येष्ठ वकील नचिकेता जोशी यांच्याकडे सादर करायचे आहेत, त्यांना ते एकत्र करून न्यायालयात हजर करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. दोन आठवड्यांनंतर या प्रकरणावर सुनावणी करताना खंडपीठाने सांगितले की, आम्ही संपूर्ण भारताच्या आधारावर समस्येचे निराकरण करण्याचा प्रयत्न करू. सुनावणीदरम्यान, खंडपीठाने शिक्षा म्हणून घर पाडण्याबाबत तोंडी चिंता व्यक्त केली. यावेळी बी आर गवई ◀◀ पान २ वर



cmyk

अग्रलेख

# न्यायदानात राजकीय अडथळेच अधिक

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेला ७५ वर्षे पूर्ण झाल्याने आयोजित कार्यक्रमामध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी महिला सुरक्षेच्या मुद्द्यांवर भाष्य केले. आजच्या काळात महिलांवरील अत्याचार मुलांची सुरक्षा हे विषय समाजासाठी गंभीर चिंतेचे ठरत आहेत. कठोर कायदे केले असले तरी ते अधिक सक्रिय झाले पाहिजेत. महिला अत्याचार प्रकरणांत लवकरात लवकर न्याय मिळायला हवा असे मत पंतप्रधानांनी सरन्यायाधीश धनंजय चंद्रचूड यांच्या उपस्थितीत व्यक्त केले. जलद न्याय मिळाल्यामुळे महिलांमध्ये सुरक्षा विषयी आत्मविश्वास वाढेल असे सांगतानाच न्यायपालिका ही संविधानाची रक्षक मानली जाते आणि न्यायपालिकेने ही जबाबदारी चोखपणे पार पाडली आहे असे गौरवोद्गार देखील पंतप्रधानांनी काढले. जनतेचा न्यायव्यवस्थेवर विश्वास असल्याचेही ते म्हणाले. मैलाचे दगड ठरणाऱ्या समारंभात देशाच्या प्रमुख पदावर बसलेल्या व्यक्तींनी असे औचित्यपूर्ण बोलणे अगत्याचेच. मात्र त्या बोलण्याची प्रचिती दैनंदिन व्यवहारात येईल याची कोणत्याही काळात खात्री देता येत नाही.

सर्वोच्च न्यायालयाच्या स्थापनेच्या ७५ व्या वर्षाच्या निमित्ताने एक नाणे आणि टपाल तिकीट जारी करून या व्यवस्थेचा बहुमान झाला असला तरीही गेल्या काही वर्षातील न्यायपालिकेसंबंधी घटना किंवा महिला सुरक्षेच्या संबंधातील घटना आठवल्या तरी सुद्धा बोलणे कौतुकास्पद असले तरी त्यामुळे वास्तव बदलत नाही हे स्पष्ट होईल. खुद्द यापूर्वी एका सरन्यायाधीशांवर त्यांच्याच कार्यालयात काम करणाऱ्या महिलेने केलेले आरोप आणि ते प्रकरण सरन्यायाधीशांनी ज्या पद्धतीने हाताळले ते लक्षात घेतले तर कायदा कसा व्यक्तिसापेक्ष बनू शकतो हे ढळढळीतपणे समोर आले. त्याच महोदयांनी आपली न्यायालयीन कारकीर्द संपताना राजकीय क्षेत्रात कशी उडी घेतली आणि खासदारकी मिळवून कशी धन्यता मानली हेही व्यवस्थेने पाहिले आहे. त्यापूर्वी काही न्यायाधीशांनी न्यायव्यवस्था धोक्यात आहे म्हणून पत्रकार परिषद घेतली होती, हेही देश विसरलेला नाही. त्याची यादी एका सरन्यायाधीशांनी न्यायालयात न्यायाधीशांचीच असलेली कमतरता आणि त्यामुळे देशभर प्रलंबित असलेल्या खटल्यांबद्दल चिंता व्यक्त करताना पंतप्रधानांसमोर अश्रू ढाळण्याचे देखील देशाच्या विस्मरणात गेले नाही. या सगळ्या काळात घटनाच इतक्या घडल्या आहेत की, कोणत्या लक्षात ठेवाव्यात आणि कोणत्या विसराव्यात किंवा कोणत्याचे संदर्भ मन:पटलावरून लुप्त व्हावेत याचा काही हिशेब राहिलेला नाही.

पुण्यातील पोर्शेकार अपघात घटनेनंतर किंवा दिल्लीच्या निर्भया बलात्कार घटनेनंतर रात्री उशिरा मुली घराबाहेर का पडतात? त्यामुळे अपघात, बलात्कारी वृत्तीच्या लोकांचे फावते अशा प्रकारचे उलटे समर्थन करणारे महाभाग आरोपींना सहानुभूती मिळवून देण्याच्या आणि राजकीय वातावरण सत्ताधाऱ्यांच्या विरोधात जाऊ नये यासाठी व्यावसायिक पद्धतीने झटत होते हे स्पष्ट आहे. एका प्रकरणात भाजप तर एका प्रकरणात काँग्रेस सत्तेवर होती. म्हणजे अशा घटनांमध्ये फक्त व्यक्तीसापेक्षताच नसते तर पक्ष सापेक्षता सुद्धा असते हे लक्षात घेतले पाहिजे. दोन्ही घटनांतील गुन्हेगारांना बाल गुन्हेगार ठरवण्यासाठीची धडपड आणि त्यासाठी लागणारी प्रसंगी पुराव्यांमध्ये गडबड घोटाळे करणारी यंत्रणा सुद्धा घटनास्थळी सक्षमपणे कार्यरत असणे आणि त्याला डॉक्टरांपासून बाल संरक्षण न्यायालयातील न्यायाधीश नसलेल्या मात्र सरकारने नेमलेल्या व्यक्तींकडून सहानुभूती मिळणे या गोष्टींकडे समाजाचे कधीच लक्ष जात नाही. एखाद्याला निबंध लिहायला लावला जातो आणि म्हणून ते प्रकरण कोणाच्यातरी संतापातून उघड होते. मात्र बाकीच्या वेळी प्रकरणातून सुटण्यासाठी किंवा बचावासाठी हा एक न समजून येणारा खुश्कीचा मार्ग आहे.

न्यायालयात खटल्यावेळी पुढे आणले जाणारे अनावश्यक किंवा वेळ काढू मुद्दे, तक्रारदार आणि साक्षीदारांचे खच्चीकरण होईल अशी वक्तव्ये अशा अनेक घटनांचा न्यायास होणाऱ्या विलंबामागे हात असतो. त्यातूनही न्याय मिळालाच तर त्या त्या राज्यातील सत्ताधारी आपल्याला हवे असणारे गुन्हेगार काही ना काही निमित्त करून सोडवून आणू शकतात. बलात्कारी, लहान मुलांचे खून केल्याचे आरोप सिद्ध झालेले लोक असले तरीही त्यांच्या गळ्यात पुष्पमाला घालून स्वागत केले जाते. हे बिल्किस बानो प्रकरणात उघड होऊन फार काळ लोटलेला नाही. अशा गुह्यांना माफी ही बाब पक्ष आणि धर्मसापेक्ष सुद्धा बनू शकते हे याच घटनेत पाहण्यात आले. अशाने निकाल लागला तरी न्याय मिळाला का? हा प्रश्न उरतोच. याचाच अर्थ शिक्षा आणि निकालालाही जिथे अर्थ उरत नाही तिथे संविधानाने दिली गेलेली शिक्षा स्वत:चे महत्त्व तरी राखू शकते का? दुसरीकडे हैदराबाद सारख्या ठिकाणी बलात्कार होतो आणि सरकार विरोधी वातावरण होऊ नये म्हणून आरोपीला थेट चकमक दाखवून गोळ्या घातल्या जातात याला तरी न्याय म्हणावे का? ज्याला गोळ्या घातल्या तोच आरोपी होता हे कसे सिद्ध होणार? की लोकांचा संताप निवळण्यासाठीच तेवढा अशा गोष्टींचा वापर केला जाणार? बंगालमध्ये मध्यंतरी महिला अत्याचाराची जी प्रकरणे घडली ती अंगलट येण्याचे दिसताच मुख्यमंत्री ममता बॅनर्जी यांनी पवित्रा बदलला. एक महिला मुख्यमंत्री असून त्यांना तरी महिला अत्याचारांकडे पक्ष आणि धर्मनिरपेक्षपणे पाहता आले का? बदलापूरमध्ये महिला पोलीस अधिकारी असताना तिने बालिकेच्यावर झालेल्या लैंगिक अत्याचाराचे प्रकरण संस्थाचालक केवळ सत्ताधारी पक्षाच्या जवळचे आहेत म्हणून दाबून ठेवले हे न्यायाला अपेक्षित आहे का? याचा अर्थ एकच आहे परिस्थितीला शरण जाऊन न्यायाला नकार देणे किंवा न्यायाच्या प्रक्रियेला फाटे फोडणे ही समाजातल्या मूठभर पण संपूर्ण समाजावर परिणाम करणाऱ्या घटकांची मानसिकता बनली आहे. त्यांच्यामुळे खरे तर न्यायात अडथळे येत आहेत. गुंतागुंत इथे आहे. पंतप्रधान त्याच्यावर तोडगा न्यायालयाकडून मागत आहेत.



## प्रथमत: साबलखेडमध्ये पाहूण्याच्या बैलाला मान देवून बैल पोळा साजरा

**कडा । प्रतिनिधी**

आष्टी तालुक्यातील साबलखेड येथे पारंपरिक रिती रीवाज प्रमाणे सरपंच शिवाजी बूरगूंले यांनी पाहुण्याच्या बैलाची पुजा करुन मान देत प्रथमतः मान देऊन मिरवणूक काढली नंतर शेतकऱ्यांनी आपल्या लाडक्या बैलांना पुजून गोड पुरण पोळीचा तोंडात घास घालत फटाक्याची आतिशबाजी करत तोफेने आनंद उत्साह साजरा करत बैल पोळा शांततेत साजरा केला. या प्रसंगी सरपंच शिवाजी बुरंगुले, शेतकरी सुनिल गाडे, ऋषिकेश गाडे, नवनाथ गाडे(सर), एड. काकासाहेब देसाई,आजिनाथ कोकरे,सुमित संतोष देसाई, दिपक नामदेव देसाई, सन्नी साबळे,लखन साबळे, अदि बहुसंख्येने शेतकरी वर्ग या पोळा सणांनिमित मोठ्या संखेने उपस्थित होते.

# ज्येष्ठ आणि श्रेष्ठ नेतृत्व दरेकर नाना...!

**बीड जिल्ह्याच्या राजकीय पटलावरील जेष्ठ आणि श्रेष्ठ नेतृत्व माजी आमदार श्री.साहेबरावजी दरेकर (नाना) यांचा आज वाढदिवस...**

**दरेकर नाना यांचा जन्म दि.०३/०९/१९४७ रोजी आष्टी तालुक्यातील कोयाळ या गावी शेतकरी कुटुंबात झाला. आई गिताबाई उत्तम गृहिणी तर वडील नाथूजी दरेकर हे स्वातंत्र्यसैनिक होते. वडील स्वातंत्र्यसैनिक असल्याने राष्ट्रभक्तीचे धडे त्यांना घरातच मिळाले. दरेकर नानांचे प्राथमिक शिक्षण कोयाळ येथे तर पुढील शिक्षण अहमदनगर जिल्ह्यात झाले. ते अकरावीपर्यंत शिकले त्यांना समाजकारणाची आवड होती. परखड आणि प्रेमळ हा त्यांचा मूळ स्वभाव. त्यांच्यावर कम्युनिस्ट आणि पुरोगामी विचारसरणीचा प्रभाव दिसून येतो. समाजसेवा करता करता ते हळूहळू राजकारणात आले.**

सर्वप्रथम १९७८ साली दरेकर नाना जिल्हा परिषद सदस्य म्हणून पहिल्यांदा विजयी झाले. आणि ही घोडदौड अशीच पुढे सुरू राहिली. १९८५ दरम्यान त्यांनी कडा सहकारी साखर कारखान्याचे व्हाईस चेअरमन पदही त्यांनी यशस्वी पणे सांभाळले. जनसंपर्क वाढत गेला आणि त्यांनी विधानसभेचे स्वप्न पाहिले. १९८९-९० ला त्यांनी भारतीय जनता दलाची उमेदवारी मिळवली आणि चक्र या निशाणी वर निवडणूक लढवली. अटीतटीच्या या निवडणुकीमध्ये भिमरावजी धोंडे यांच्याकडून अवघ्या १८०० मतांनी पराभव झाला. परंतु ते खचले नाहीत त्यांनी घेतलेला वसा सोडला नाही आणि ते सर्वसामान्यांसाठी लढतच राहिले. प्रत्येकाच्या सुखदुःखात उपस्थित राहून कायम सर्वसामान्य जनतेत ते रमले.



पुन्हा १९९४-९५ ला नानांनी अपक्ष उमेदवार म्हणून विधानसभा निवडणूक लढवली आणि ते महाराष्ट्रात अपक्षांपैकी क्रमांक दोनच्या मताधिक्याने म्हणजे ४४,००० मतांनी विजयी झाले. शिवसेना-भाजप युतीचे महाराष्ट्राचे तत्कालीन मुख्यमंत्री श्री मनोहरजी जोशी यांच्या नेतृत्वाखाली काम केले. दरेकर नाना यांनी त्यांच्या कार्यकाळामध्ये वसंतवाडी, लांबुरवाडी, भुरेवाडी, सौताडा, जांभळडोह, कडानी असे अनेक विक्रमी एकूण ३६ (स्टोरेज टँक) साठवण तलाव केले. आणि शेती व्यवसायास चालना दिली. विविध ठिकाणी ब्रिज कम बंधारे, रस्ते, पाणी, लाईट सबस्टेशन, शाळा खोल्या, दवाखाने, व्यायामशाळा व आमदार निधीतून सभा मंडप अशी विविध विकास कामे करून आष्टी आणि पाटोदा या ठिकाणी शासकीय आयटीआय महाविद्यालय मंजूर करून घेतले. आणि सुशिक्षित बेरोजगारीवर उपाय म्हणून तरुणांना व्यवसायिक संधी निर्माण करून दिली.

पुढे १९९९ ला शरदचंद्र पवार साहेब आय काँग्रेस मधून बाहेर पडले आणि नवीन राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष स्थापन केला. तेव्हा दरेकर नाना यांनी पवार साहेबांचे नेतृत्व स्वीकारत घड्याळ हाती घेतले व निवडणूक लढवली. परंतु शिवसेना -भाजप युती सरकारचा प्रभाव असल्याने दरेकर नानांचा सुरेश आण्णा धस यांच्याकडून पराभव झाला. तरी ते थांबले नाहीत त्यांनी स्वतःचा मुलगा राजाभाऊ दरेकर यांना राजकारणात आणले आणि २००२ साली जिल्हा परिषद सदस्य केले. पुन्हा दुसऱ्यांदा चिरंजीव उद्धव बापू दरेकर यांना संधी दिली. त्यांनी बीड जिल्हा परिषदेमध्ये आपल्या नेतृत्वाची चूणूक दाखवत दोन वेळा आरोग्य व शिक्षण सभापती पदाचा यशस्वीरित्या कारभार सांभाळला. तद्नंतर त्यांच्या सुनबाईंनी सुद्धा २०१७ ला महिला व बालकल्याण सभापती म्हणून उत्तम प्रकारे हा विभाग सांभाळला. त्यांची विशेष गोष्ट म्हणजे १९७८ पासून दरेकर परिवारा वरती लोणी जिल्हा परिषद गटाने अजतागायत निवडणुकीत विजय मिळवून दिला आहे. आणि दरेकरांचं नेतृत्व स्वीकारलं आहे. आवर्जून सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ग्रामपंचायत स्थापन झाली. तेव्हापासून अजतागायत गावची ग्रामपंचायत दरेकर नानांनी बिनविरोध करून मोठा आदर्श निर्माण केला.

दरेकर नानांची पवार साहेबांवर अफाट श्रद्धा आहे. पवार साहेबांच्या सूचनेनुसार नानांनी सुरेश आण्णा धस, बाळू काका आजबे, आणि आता २०२४ च्या लोकसभेला बजरंग बाप्पा सोनवणे यांना विजयी करण्यात महत्त्वाचे योगदान दिले. आजही सर्वसामान्य जनता केंद्रबिंदू म्हणून त्यांचे कार्य अविरतपणे चालू आहे. तसं पाहिलं तर दरेकर नाना आणि उद्धव (बापू) दरेकर यांचा दांडगा जनसंपर्क बघून आष्टी पाटोदा शिरूर मतदार संघाची उमेदवारी माननीय शरदचंद्र पवार साहेब त्यांचे प्रामाणिक शिलेदार दरेकर नानांना देतील अशी मतदार संघातील जनतेची भावना आहे. ती सत्य व्हावी हीच अपेक्षा. आणि नाना पुन्हा एकदा आमदार व्हावेत. त्यांना उत्तम आरोग्य लाभावं याच वाढदिवसाच्या मनःपूर्वक शुभेच्छा देतो. आणि माझ्या लेखणीला पूर्णविराम देतो.

**श्री.संजय शेळके (सर)**
रा.पांढरी ता.आष्टी., मो.९९७५२२८५८५

# माऊली माऊली गुरुराज माऊली च्या जयघोषात भव्य शोभायात्रा..

## प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री.शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर यांच्या ४० व्या अनुष्ठानाची सांगता

**बीड । प्रतिनिधी**

**बीड तालुक्यातील श्रीक्षेत्र कपिलधार येथे प.पु.ष.ब्र.१०८ तपोरत्न श्री. शिवानंद शिवाचार्य महास्वामीजी तमलूरकर ता.देगलुर जि.नांदेड यांचे श्रीक्षेत्र कपिलधार येथे ४० वे अनुष्ठान सुरू होते .या अनुष्ठानात शिवपाठ , सामुहिक ईष्टलिंगपुजा, गाता भजन व गुरूवर्यांचे अमृत उपदेश व शिवमहिमा महाराज सांगत आहेत.**

दिनांक ३१/८/२०२४ शनिवारी रोजी भव्य अश्व शोभा यात्रेने व स्वामी महाराजांच्या जयघोषने या अनुष्ठानाची सांगता झाली. हि भव्य मिरवणूक मन्मथ स्वामी च्या समाधी स्थाना शिवानंद







शिवाचार्य महाराजांनी जमलेल्या सर्व भाविक भक्तांना व जमलेल्या जनसमुदायांना उपदेश पर आशीर्वाद दिला व या महिन्याचे व अनुष्ठानचे महिमा सांगितली. श्रीक्षेत्र कपिलधार येथे चालू असलेल्या श्रावण मास अनुष्ठान, रुद्र पूजा ,व गुरु माऊलींचे अमृत उपदेश ऐकण्यासाठी आंध्रप्रदेश,कर्नाटक , तेलंगणा आदी विविध राज्यातून तसेच पंचक्रोशीतील असंख्य भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. शेवटी जमलेल्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचा व भोजनाचा आनंद घेतला.

## पान १वरून...

### कापूस, सोयाबीन अनुदान १०

सहाय्याने तत्काळ सोडवून शेतकऱ्यांना येत्या १० सप्टेंबर पासून अर्थ सहाय्य थेट खात्यात वितरित करण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच कापूस आणि सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना अर्धा एकरपेक्षा कमी क्षेत्रासाठी सरसकट १००० रुपये तर अर्धा एकरपेक्षा जास्त क्षेत्रासाठी त्यांच्या क्षेत्रानुसार प्रति हेक्टर रुपये पाच हजार अर्थ सहाय्य मंजूर करण्यात आले. धनंजय मुंडे यांनी १० सप्टेंबरपासून अनुदान शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्याच्या सूचना केल्या. पण पात्र शेतकऱ्यांच्या नावाचा गोंधळ कायम आहे. ई-पीक पाहणीची अट कायम असल्याने शेतकरी नाराजी व्यक्त करत आहेत. २०२३ च्या खरीप हंगामात ई पीक पाहणी करूनही सातबारावर सोयाबीन कापूस पिकांची नोंद नाही. त्यामुळे शेतकऱ्यांचे नाव अनुदान यादीत आले नाही, अशी तक्रार शेतकरी करत होते. या पार्श्वभूमीवर कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी परळीतील कार्यक्रमात भाषणा दरम्यान ई पीक पाहणी नोंदची अट रद्द करण्याची विनंती मुख्यमंत्र्यांकडे केली. त्यावेळी मुख्यमंत्री शिंदे यांनी शेतकऱ्यांसमोर ई पीक पाहणी अट रद्द करण्याची घोषणा केली. परंतु अनुदान कार्यपद्धतीच्या शासन निर्णयात ई पीक पाहणी अट कायम असल्याचे स्पष्ट झाले आहे.

------------

### साहेबराव दरेकर नाना यांच्या अभिष्टचिंत

आमदार रोहित पवार,आमदार संदीप क्षीरसागर ,युवकचे प्रदेशाध्यक्ष महेबूब शेख ,माजी आमदार राजेंद्र जगताप, जनार्दन तुपे, सुशीलाताई मोराळे ,राम खाडे,अण्णासाहेब चौधरी ,बापूसाहेब डोके ,अमोल तरटे,डॉ. सुभाष वाळके माजी शिक्षण सभापती उद्धव दरेकर, राजेंद्र दरेकर यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेतेमंडळी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित राहणार आहेत. माजी आमदार साहेबराव दरेकर हे गेल्या अनेक वर्षापासून समाजकारणात सक्रिय आहेत. त्यांचा मतदारसंघात व बीड जिल्ह्यातही दांडगा संपर्क असून शरदचंद्र पवार यांना मानणारे ते जुन्या पिढीतील नेते आहेत. पवार साहेबांशी त्यांचे अत्यंत जवळचे व सलोख्याचे संबंध असून पवारांच्या विचारांना मानणाऱ्या महत्त्वाच्या व्यक्तींपैकी ते एक आहेत. त्यांच्या अभिष्टचिंतन सोहळ्यानिमित्त रक्तदान शिबिराचे ही आयोजन केले असून या सोहळ्यास मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन परमेश्वर शेळके यांनी केले आहे..

-----------

### कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी

पूजन करताना स्वतः धनंजय मुंडे हे सुद्धा गुणगुणताना दिसले. यावेळी देशाच्या समृद्ध कृषी परंपरेमध्ये बळीराजाच्या सोबतीने किंबहुना बळीराजाच्या बरोबरीने कष्ट उपसणाऱ्या बैलांच्या प्रति कृतज्ञता व्यक्त करण्याचा बैलपोळा हा सण असून या निमित्ताने राज्यातील समस्त शेतकरी बांधवांना आपण शुभेच्छा देतो, असे धनंजय मुंडे यांनी म्हटले. या प्रसंगी धनंजय मुंडे यांच्या मातोश्री रुक्मिणीबाई मुंडे, बंधू अजय मुंडे व अभय मुंडे आदी उपस्थित होते. दरम्यान, बैलपोळ्याची आपली पारंपारिक प्रथा जपत कृषी मंत्री धनंजय मुंडे यांनी कृषी विभागाच्या दोन बैठकांनाही ऑनलाईन मार्गदर्शन केले. याशिवाय मागील दोन-तीन दिवसापासून बीड जिल्ह्यासह राज्यात मराठवाड्यातील अनेक जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे, त्या नुकसानीचाही ऑनलाइन बैठकीत अधिकाऱ्यांकडून आढावा घेतला. आवश्यक त्या ठिकाणी पावसाचा जोर कमी झाल्यानंतर पंचनामे करण्याचे आदेशही त्यांनी दिले आहेत. त्याचबरोबर मनुष्यहानी, पशुहानी होणार नाही, या पद्धतीने आपत्ती व्यवस्थापन करण्याच्या सूचनाही संबंधित यंत्रणाना दिल्या.

--------

### अतिवृष्टीच्या अनुषंगाने आ.संदीप

सध्या त्याठिकाणी वास्तव्यास आहेत. या गावाची रचना, वरच्या बाजूला डोंगर व खालच्या बाजूला नदी आणि मधोमध गाव अशाप्रकारची आहे. त्यामुळे तेथे भूस्खलन होण्याचा धोका सातत्याने जाणवत आहे. या गावातील लोकांचे संरक्षण होण्याच्या दृष्टीने या गावाचे पुनर्वसन करण्याची मागणी गेल्या अनेक दिवसांपासून आहे. तसेच याबाबतचा प्रस्तावही गेल्या अनेक वर्षांपासून शासनस्तरावर प्रलंबित आहे. दरम्यान सद्यस्थितीला गावातील कुटुंबे व नागरिकांचे सरंक्षण व्हावे यासाठी नदीच्या कडेला व डोंगरी भागात सरंक्षण भिंत बांधणे, डोंगरी भागात लोखंडी जाळी मोठया प्रमाणात बसवावी यासोबतच येथील सुरक्षेसाठी तांत्रिकदृष्ट्या आवश्यक असलेल्या सर्व बाबी त्याठिकाणी राबविण्यात याव्यात यासोबतच बीड जिल्ह्यात अशाप्रकारचा धोका असलेल्या ठिकाणी उपाययोजना कराव्यात याकरिता जिल्हाधिकारी यांच्याकडे आ.संदीप क्षीरसागर यांनी मागणी केली आहे. तसेच बीड शहरात मागील दोन दिवसांच्या अतिवृष्टीने शहरात अनेक अडचणी निर्माण झाल्या आहेत. बीड शहरानजीक असलेल्या बिंदुसरा धरण पूर्ण क्षमतेने भरून वाहत असल्याने बीड शहरातील नदीकाठच्या नागरिकांना, व्यापाऱ्यांना नगरपालिकेच्या वतीने सतर्कतेचा इशारा देण्यात येत आहे. परंतु याबाबत काळजी घेणे देखील महत्वाचे आहे. शहरातील अनेक भागांमध्ये स्वच्छतेअभावी नागरिकांच्या राहत्या घरामध्ये पाणी शिरले आहे. त्यामुळे नागरिकांची मोठी गैरसोय होत असून दैनंदिन जीवन, आरोग्य तसेच इतर प्रकारच्या समस्या निर्माण होत आहेत. याबाबत नगरपालिकेच्या वतीने नाली स्वच्छता करून नागरिकांना रस्ते व सोयीसुविधा देण्यासाठी यंत्रणेला आदेशित करा अशा सूचना आ.क्षीरसागर यांनी बीड नगरपालिकेचे मुख्याधिकारी यांना दिल्या आहेत. तसेच मांजरसुम्बा-लिंबागणेश-पाटोदा रस्त्याचे काम काही दिवसांपूर्वी पूर्ण झाले आहे. हा रस्ता मोरगाव ग्रामपंचायत अंतर्गत असलेल्या जाधव-वस्ती याठिकाणाहून जातो परंतु याठिकाणी रस्त्याच्या दोन्ही बाजूला नालीचे बांधकाम होऊन पावसाच्या पाण्याची विल्हेवाट लावणे गरजेचे असताना याठिकाणी अशी कोणतेही काम झाले त्यामुळे सध्या सदरील ठिकाणी वास्तव्यास असलेल्या शेतकऱ्यांच्या घरात आणि शेतात पाऊस झाला कि पाणी शिरते. दरम्यान दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसामुळे त्यांच्या शेतात आणि घरात आजदेखील पाणी साचून राहिले असल्याची परिस्थिती आहे. त्यामुळे आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे संभाजीनगर विभागाचे कार्यकारी अभियंता यांच्याकडे पत्रव्यवहार करून तातडीने मांजरसुम्बा-लिंबागणेश-पाटोदा रस्त्यावर जाधव वस्ती येथे उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

---------

### आयकर कायद्या संदर्भात

स्पष्ट आणि समजण्यास सोपा बनवणे आहे, ज्यामुळे वाद आणि खटले कमी होतील आणि करदात्यांना अधिक कर निश्चितता मिळेल असे आश्वासन दिले होते.

-----------

### सततच्या पावसामुळ

आहे. दि. २ सप्टेंबर २०२४ रोजी सकाळी ८ वा. जिल्ह्यात ९२ मिलीमिटर इतका पाऊस झाला आहे. तसेच एकूण ६२ महसूल मंडळात अतिवृष्टीची नोंद झाली असून त्यापैकी ३५ महसुली मंडळामध्ये १०० मिलीमिटर पेक्षा जास्त पावसाची नोंद झाली आहे. बीड जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात पाऊस पडत आहे. या पावसामुळे जिल्ह्यातील अनेक नदी नाल्यांना पूर आलेले आहेत. कोसळणाऱ्या या पावसामुळे आणि नदी नाल्यांना आलेल्या पुरापासून नागरिकांनी दक्षता बाळगावी. पूर नियंत्रण रेषेत राहणाऱ्या नागरिकांनी तात्काळ सुरक्षित ठिकाणी स्थलांतर करावे, कुठल्याही प्रकारची जीवित वा वित्त हानी होणार नाही याची दक्षता घ्यावी, असे आवाहन जिल्हाधिकारी श्री. पाठक यांनी केले आहे. जायकवाडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात सर्वत्र पाऊस झाला आहे. त्यामुळे यापुढे कोणत्याही क्षणी जायकवाडी (पैठण) धरणातून गोदावरी नदीपात्रात पाण्याचा विसर्ग सुरु करण्यात येईल. जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलसाठे पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. आज बैलपोळा असून बरेच शेतकरी त्यांची जनावरे धुण्यासाठी जालसाठ्यांवर जातात, त्या ठिकाणी काही दुर्देवी घटना घडण्याच्या शक्यता नाकारता येत नाहीत. त्यामुळे सर्व शेतकऱ्यांनी व पशुपालकांनी सतर्क राहून सुरक्षेच्या दृष्टीने दक्ष राहून पोळा साजरा करण्याचे आवाहन ही जिल्हा प्रशासनाने केले आहे. बिंदुसरा धरणात सध्या पाण्याचा प्रवाह मोठ्या प्रमाणात सुरु असल्याने सदर जोखीमेच्या ठिकाणी जाऊन नागरिकांनी फोटो, सेल्फी, छाया चित्रीकरण करु नये. नदी किनाऱ्या लगतच्या गावातील नागरिक, पशुधन तसेच पालकांनी विशेषतः लहान मुलांची उचित काळजी घ्यावी, असे ही प्रशासनातर्फे सुचित करण्यात आले आहे. या पावसामुळे जिल्ह्यात शेतीपिकांचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन आदेश क्रमांक सीएलएस-२०२३/प्र.क्र.२६०/म-३ दिनांक २२.०७.२०२४ नुसार जिल्ह्यामध्ये ज्या महसुली मंडळात अतिवृष्टी झाली आहे किंवा यापुढे होईल, त्या जिल्ह्यातील शेतीपिकांचे पंचनामे विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक २९.०७.२०२४ नुसार जिल्हयात अतिवृष्टीने शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास शेतीपिकांचे पंचनामे करण्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय अधिकारी सर्व, तहसिलदार सर्व यांना कळविले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात लिहीले आहे.

-----------

### शेतकऱ्यांच्या उत्पन्नवाढीसाठी १४

७ मोठे कार्यक्रम जाहीर केले आहेत. यामध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा लाभ शेतकऱ्यांना सोप्या पद्धतीने उपलब्ध करून देण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. यामुळे शेतकरी आता २० मिनिटांत कर्ज घेऊ शकणार आहेत. केंद्रीय मंत्री म्हणाले की, सरकारने शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेल्या निर्णयांमध्ये डिजिटल कृषी मिशन, अन्न आणि पोषण सुरक्षेसाठी कृषी विज्ञान बळकटीकरण, कृषी शिक्षण आणि व्यवस्थापन, पशुसंवर्धन, फलोत्पादन, नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन यांचा समावेश आहे. ते म्हणाले की, सरकारने डिजिटल कृषी मिशनला शेतकऱ्यांना सर्व माहिती मोबाईलवर उपलब्ध करून देण्याची परवानगी दिली आहे. यासाठी सरकार २ हजार ८१७ कोटी रुपये खर्च करणार आहे. त्याअंतर्गत शेतकऱ्यांची, गावातील जमीन आणि पिकांची नोंदणी केली जाणार आहे. याशिवाय भू-स्थानिक डेटा, दुष्काळ आणि पुराचे निरीक्षण, पाण्याची उपलब्धता, हवामानाची माहिती, पीक विमा आदी कामे केली जाणार आहेत. ते म्हणाले की, मंत्रिमंडळाने अन्न आणि पोषण सुरक्षेसाठी ३ हजार ९७९ कोटी रुपये मंजूर केले आहेत. याअंतर्गत संशोधन, वनस्पती अनुवांशिक संसाधन व्यवस्थापन, अन्न व चारा पिकांसाठी अनुवांशिक सुधारणा, कडधान्य व तेलबिया पिकांमध्ये सुधारणा, व्यावसायिक पिके व कीटक, सूक्ष्मजीव, परागकण आदींमध्ये सुधारणा यावर संशोधन केले जाणार आहे. जेणेकरून त्याचा लाभ शेतकऱ्यांना मिळू शकेल. यासोबतच शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी कृषी शिक्षण, व्यवस्थापन आणि बळकटीकरणासाठी २ हजार २९१ कोटी रुपये मंजूर करण्यात आले आहेत. केंद्रीय मंत्री म्हणाले की, जनावरांच्या आरोग्यासाठी आणि विकासासाठी १ हजार ७०२ कोटी रुपयांची आणखी एक योजना मंजू करण्यात आली. केंद्र सरकारने फळबागांसाठी ८६० कोटी रुपयांची योजना देखील मंजूर केली आहे. वैष्णव म्हणाले की, मंत्रिमंडळाने कृषी विज्ञान केंद्रांसाठी १ हजार २०२ कोटी रुपये आणि नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन मजबूत करण्यासाठी १ हजार ११५ कोटी रुपयांची योजना मंजूर केली आहे. केंद्रीय मंत्रिमंडळाने गुजरातमधील साणंद येथे सेमीकंडक्टर युनिट स्थापन करण्याच्या केन्सच्या प्रस्तावालाही मंजुरी दिली आहे. यासाठी ३ हजार ३०७ कोटी रुपयांची गुंतवणूक करण्यात येणार आहे. हा प्रकल्प ४६ एकरांवर बांधण्यात येणार असल्याचे केंद्रीय मंत्री म्हणाले. या प्रकल्पासाठी कंपनीने गुजरातमधील साणंद येथे यापूर्वीच जमीन संपादित केली असून लवकरच बांधकामाला सुरुवात होणार आहे.

**बळीराजासाठी सरकारचे ७ निर्णय**

डिजिटल कृषी मिशन. अन्न, पोषण सुरक्षेसाठी कृषी विज्ञान बळकटीकरण योजना. कृषी शिक्षण आणि व्यवस्थापन बळकट करण्यासाठी कार्यक्रम. पशुसंवर्धनासाठी योजना. फलोत्पादनाच्या शाश्वत विकासासाठी निधी. कृषी विज्ञान केंद्रांच्या बळकटीकरणासाठी निधी. नैसर्गिक संसाधन व्यवस्थापन योजना.

-------------

### आरोपीसाठी घरावर बुलडोझर

म्हणाले की, फक्त तो आरोपी आहे म्हणून घर कसे पाडले जाऊ शकते? तो दोषी असूनही त्याचे घर पाडता येत नाही.. असे स्पष्ट करत न्यायालय अनधिकृत बांधकामांना संरक्षण देणार नाही, तर काही मार्गदर्शक तत्त्वे आवश्यक असल्याचे मतही यावेळी स्पष्टपणे नमूद केले.

------------

**टी.सी. हरवला आहे.**

अक्रुर बब्रुवान गिरी या विद्यार्थ्यांचा B.A.F.Y पास चा टि.सी काडीवडगाव ते माजलगाव एसटी बस प्रवासादरम्यान हरवला आहे. जर कोणाला सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करा.

:::संपर्क:::

अक्रुर बब्रुवान गिरी, मो.नं ८९९९५६६९३७

cmyk

दैनिक **राज्य लोकतंत्र**

नवी दिशा... नवे विचार.....

मंगळवार दि. ३ सप्टेंबर २०२४



## जिल्ह्यात शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश जारी –उपजिल्हाधिकारी हदगल

जालना, (प्रतिनिधी) जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था, सार्वजनिक शांतता व सुरक्षितता राखण्यासाठी मुंबई पोलीस अधिनियम १९५१ च्या कलम ३७ (१) (३) अन्वये जालना जिल्ह्याच्या संपूर्ण हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी करण्यात आली आहे, असे आदेश अपर जिल्हादंडाधिकारी शशिकांत हदगल यांनी जारी केले आहेत.

संपूर्ण जालना जिल्ह्याच्या हद्दीत शस्त्रबंदी व जमावबंदी आदेश शुक्रवार दि. ३० ऑगस्ट रोजी सकाळी ६ वाजेपासून ते दि. १३ सप्टेंबर २०२४ रोजीच्या २४ वाजेपर्यंत लागू राहील. या आदेशान्वये शस्त्रे, सोटे, तलवारी, भाले, दंडे, बंदुका, सुरे, काठ्या, लाठ्या किंवा शारीरिक इजा करण्यासाठी वापरता येईल, अशी कोणतीही वस्तू सोबत बाळगता येणार नाही. व्यक्तीचे प्रेते, आकृत्या व प्रतिमा यांचे प्रदर्शन करता येणार नाही. जाहीरपणे घोषणा, गाणे म्हणणे, वाद्य वाजविणे यास प्रतिबंध राहील. तसेच कोणत्याही रस्त्यांवर किंवा कोणत्याही एका ठिकाणी पाच किंवा अधिक व्यक्तींना एकत्र जमण्यास किंवा मिरवणूक काढण्यास मनाई करण्यात आली आहे. हा आदेश अधिकारी- कर्मचाऱ्यांना लागू राहणार नाही, असेही आदेशात नमूद करण्यात आले आहे.

# आपत्ती निवारणासाठी प्रशासन सज्ज

## नागरिकांनी घाबरु नये, दक्षता बाळगावी –जिल्हाधिकारी पांचाळ

जालना । प्रतिनिधी

मान्सून कालावधीत आपत्ती निवारणासाठी जिल्हा प्रशासन सज्ज आहे. एखाद्या ठिकाणी आपत्ती उद्भवल्यास तेथील नागरिकांपर्यंत प्रशासनातील अधिकारी, कर्मचारी लवकरात लवकर पोहोचून मदत करतील, असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जिल्ह्यात सरासरीपेक्षा जास्तीचा पाऊस झालेला आहे. आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज असून आपत्तीचा सामना करण्यासाठीची साधनसामुग्री सज्ज ठेवावी अशा सुचनाही उपविभागीय अधिकारी आणि तहसीलदार यांना दिलेल्या आहेत. तसेच उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांच्यासह सर्व विभाग प्रमुखांनी आपले मुख्यालय सोडू नये. आपत्तीचा सामना करण्यासाठी जिल्हा प्रशासन सज्ज झाले असून जिल्ह्यातील नागरिकांनी घाबरुन जावू नये तर दक्षता बाळगावी.

शेती किंवा मालमत्ता नुकसानीचे पंचनामे उपविभागिय अधिकारी आणि तहसीलदार यांनी निकषानूसार करावेत, अशा सूचना ही जिल्हाधिकारी डॉ.श्रीकृष्ण पांचाळ यांनी दिल्या आहेत. भोकरदन शहरातील केळना नदीला पूर आल्याने आलापूर परिसरातील पुल वाहतुकीसाठी बंद केला आहे. नदीलगतच्या ४घरातील २३ लोकांसह त्यांचे नातेवाईक स्थलांतरित झाले आहे. घनसावंगी तालुक्यात बाणेगाव येथे शिवाजी विठ्ठल शिंदे गोदावरी नदीत बुडून मयत झाले आहेत. अंतरवाली टेंभी नजीक पांढरे वस्तीवरील पन्नास जणांना सुरक्षित ठिकाणी हलविण्यात आले आहे. पाडोळी बुद्रुक येथे पुरात सापडलेले तीन जणांना सुखरूप बाहेर काढण्यात यश आले आहे. भुतेगाव ते करडगाव मधील पूल वाहून गेला तर चित्र वडगाव येथील एक पूल वाहून गेला. मयत जनावरांमध्ये पिंपरखेड येथील २० कोंबड्या, पानेवाडी ४ शेळ्या, तीर्थपुरी २६ येथील कोंबड्या, गुरु पिंपरी येथील ६ शेळ्या, शिंदे वडगाव येथील २ बैल, १ गाय व ५शेळ्या तसेच बहिरेगाव एक गाय यांचा समावेश आहे. दि. १ सप्टेंबर २०२४ रोजी जालना जिल्ह्यात एकूण १०७.३ मि.मी. पाऊस झाला आहे. एकूण २९ मंडळांमध्ये अतिवृष्टी झाली असल्याची नोंद झालेली आहे. जालना तालुका- जालना ग्रामीण १५०.५ मि.मी. , नेर १२०.३ मि.मी., विरेगांव १३७.५ मि.मी., पाचन वडगांव ८७.३ मि.मी. , बदनापूर तालुका- शेलगांव ७१.०० मि.मी. , दाभाडी ८१.५ मि.मी., भोकरदन तालुका- भोकरदन ८७.८ मि.मी , आन्वा ८९.५ मि.मी , हसनाबाद ९२.८ मि.मी , जाफ्राबाद तालुका- माहोरा ७३.३ मि.मी, परतूर तालुका- आष्टी १२७.८ मि.मी , सातोना १३४.३ मि.मी , मंठा तालुका- तळणी १०७ मि.मी , ढोकसाळ १३०.५ मि.मी , पांगरी १२०.३ मि.मी अंबड तालुका- अंबड १९४.८ मि.मी , धनगर पिंपरी १५१ मि.मी , जामखेड १७५.८ मि.मी , रोहीलागड १५८ मि.मी , गोंदी १३१.५ मि.मी , वडीगोद्री २२७.८ मि.मी, सुखापूरी २३३.८, घनसावंगी तालुका- घनसावंगी २८०.८ मि.मी., राणी उंचेगाव २५१.८ मि.मी., तिर्थपूरी २६९ मि.मी., कुंभार पिंपळगांव २५९.३, मि.मी., अंतरवाली १०७ मि.मी., रांजणी ९२.८ मि.मी., आणि जांबसमर्थ १६७.३ मि.मी. अशी पावसाची आकडेवारी आहे. जिल्हा प्रशासन सतर्क असून सर्व यंत्रणा क्षमतेने मदत आणि बचाव कार्यात कार्यरत आहेत. नागरिकांनी घाबरून न जाता आपत्ती व्यवस्थापनात प्रशासनाला सहकार्य करावे असे आवाहन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले आहे.

## अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे नुकसान, अनेकांचे संसार उघड्यावर, नुकसान भरपाई मिळवून देणारा- सतीश घाटगे



घनसावंगी । प्रतिनिधी

तालुक्यात गेल्या दोन दिवसापासून होत असेल्या सततच्या पावसामुळे आणि ढग फुटीमुळे शेतकऱ्यांचे खरीप पिकांचे अतोनात नुकसान झाले. भाजपा नेते सतीश घाटगे यांनी सोमवारी घनसावंगी तालुक्यातील बाधित गावांना भेटी देऊन नुकसानीची माहिती घेतली. तसेच बाधित शेतकरी कुटुंबाना भेटून धीर दिला. अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतातील उभे पिक वाहून गेले आहे. अनेक शेतकरी कुटुंबाचे घरे वादळी पावसात पडल्याने त्यांचे संसार उघड्यावर आले आहे. या कुटुंबाना तातडीने मदत करण्याची मागणी सतीश घाटगे यांनी केली आहे.


घनसावंगी तालुक्यातील शेवगळ, अंतरवाली टेंभी, कोठी , भुतेगाव , ढाकेफळ , लिंबोणी, पिंपरखेड बुद्रुक यासह अनेक गावाला अतिवृष्टीचा तडाखा बसला. या पावसात नद्या नाल्यांना पूर आल्याने नदीकाठच्या शेत जमिनी वाहून गेल्या तर नदी काठच्या गावात पाणी शिरल्याने शेतकऱ्यांच्या घराची पडझड झाली पशुधन वाहून गेले. या संकटामुळे शेकडो शेतकऱ्यांचा फटका बसला आहे. नैसर्गिक संकटामुळे बाधित शेतकऱ्यांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करून मदत करण्याची मागणी सतीश घाटगे यांनी जिल्हा प्रशासनाकडे केली आहे.

वाहून गेलेल्या रस्त्याची सतीश घाटगेंकडून दुरुस्ती

घनसावंगी तालुक्यातील शेवगळ या गावाला मुख्य रस्ता पुराच्या पाण्यात वाहून गेल्याने या गावाचा बाजारपेठेशी असलेला संपर्क तुटला. सतीश घाटगे यांनी या गावाला भेट देऊन वाहून गेलेला रस्ता युद्ध पातळीवर दुरुस्त करण्यास सुरुवात केली. त्यामुळे गावकऱ्यांची मोठी अडचण दूर झाली.

नुकसानभरपाईसाठी पालकमंत्र्याकडे पाठपुरावा करणार

घनसावंगी तालुक्यातील शेतकऱ्यांवर आलेल्या अतिवृष्टीच्या संकटाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान केले आहे. शेतकऱ्यांच्या कष्टावर पाणी फिरले आहे. ढगफुटीमुळे शेतात पाणी साचल्याने पिके वाहून गेली आहे तर अनेक गावातील गरीब कुटुंबाच्या घराची पडझड होऊन संसार उघड्यावर आले आहे. या संकटात शेतकऱ्यांना धीर देण्यासाठी नुकसानग्रस्त कुटुंबाना तातडीने मदतीची गरज आहे. यासाठी युद्ध पातळीवर पंचनामे करून लवकरात लवकर मदत कशी मिळेल यासाठी मी प्रयत्न करणार आहे. अशी आव्हान नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना सतीश घाटगे भाजपा नेते यांनी आश्वासन दिले आहे.



शिवसेनेचे जिल्हाप्रमुख भाऊसाहेब घुगे यांनी भराडखेडा या गावी कुटुंबिया समवेत बैलपोळा सण साजरा केला यावेळी त्यांच्या पत्नी मा. सरपंच कल्पना घुगे, आई पार्वतीबाई घुगे, बंधू कैलास पालवे, वहिनी कुसुम पालवे, मनीषा घुगे, इंजि.अजिंक्य घुगे आदित्य घुगे यांची उपस्थिती होती

## ढग फुटीमुळे अतिवृष्टी नुकसान शेतकऱ्यांना तात्काळ मदत करावी -सुरेश पवार

मंठा । प्रतिनिधी

मागील दोन दिवसात पावसाने मंठा तालुक्यात थैमान घातले असुन शेतकर्यांच्या हातातोंडाशी आलेला घास या पावसाने हिरावुन घेतला असुन तालुक्यातील नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रु सरसगट तात्काळ आर्थिक मदत करावी अशी मागणी सामाजीक कार्यकर्ते सुरेश पवार यांनी केली आहे.

मंठा तालुक्यातील खरीप पिकांची झालेली वातहात बाबतची माहिती कॉंग्रेस प्रदेशाध्यक्ष नानाभाऊ पटोले यांची भेट घेऊन सांगितले आहे.या वेळी श्री पवार यांनी शेतकरी हा अशिक्षीत असल्यामुळे ई पीक पाहणीचा ऑनलाईनचा ससेमिरा न लावता पिक विमा कंपनी व महसुल विभागाच्या अधिकार्यांनी प्रत्येक गावात जाऊन चावडीवर किंवा मंदीरावर बसुन ऑनलाईनची प्रक्रिया करून घ्यावी या साठी शासनाकडे आग्रह करण्याची विनंती केली आहे. सध्या मंठा तालुक्यात परतीच्या पावसाने धुमाकूळ माजविला असुन कापुस, सोयाबीन,हळद,तूर या पिकांचा फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.त्या मुळे शेतकऱ्यांना तात्काळ आर्थिक दिलासा देण्याची गरज असुन त्यांना तात्काळ मदत द्यावी अशी मागणी श्री पवार यांनी केली आहे.



नुकसानीचा तात्काळ आढावा सादर

मंठा तालुक्यासह शहरात ढगफुटीसदृष पाऊस झाल्यामुळे तालुक्यासह शहरात मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असुन या नुकसानीचा सुरेश पवार यांनी आढावा घेऊन नानाभाऊ पटोले यांच्यासह प्रशासनातील संबंधींतांना अहवाल सादर करून तात्काळ उपाययोजनेची मागणी त्यांनी केली आहे.मागील पाच ते सहा वर्षापासुन शेतकरी राजा अनेक निसर्ग संकटाला तोंड देत आहे. त्यामुळे आर्थिक संकटात सापडला आहे. काल झालेल्या पावसामुळे तोंडचा आलेला सोयाबीन, कापुस यासह विविध पिके पावसामुळे भिजून नासाडी झाली आहे. कोणतेही पिक शेतकर्यांच्या हाती आले नसुन सरकारने शेतकर्यांना नुकसान भरपाई स्वरूपात आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी सामाजिक कार्यकर्ते सुरेश पवार यांनी केली आहे.

## जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात पालक बैठक संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई शहरातील श्री बालाजी शिक्षण प्रसारक मंडळ संचलित जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दिनांक ३१ ऑगस्ट रोजी शिक्षक पालक बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत विद्यालयात राबविण्यात येत असलेल्या विविध उपक्रमाविषयी माहिती देऊन पालकांच्या देखील विद्यार्थ्यांबाबत अडीअडचणी ऐकून घेण्यात आल्या. बैठकीच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक विनायक मुंजे हे होते. विद्यालयात शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून साप्ताहिक चाचणी हा उपक्रम राबविण्यात येत आहे. सदरील उपक्रमात सहा विषयांचे विभाजन तीन आठवडयात करून दर आठवडयाला दोन विषयाची मागील महीन्यात अध्यापन केलेल्या घटकांवर चाचणी घेण्यात येते. या चाचणीचा उपयोग विद्यार्थ्यांच्या प्रगतीचा मागोवा घेणे आणि त्यांच्या विषयातील अडचणी सोडवणे हा आहे.



जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात या वर्षी पासून दर शनिवारी विविध उपक्रमासह चाचणी उपक्रम देखील घेण्यात येत आहे. प्रत्येक महीन्याच्या शेवटच्या दिवशी पालकांना बोलावून त्यांना मागील महीन्यामध्ये आणि पुढील महीन्यातील उपक्रम याबाबत माहीती दिली जाते. शनिवार माझ्या आवडीचा या अंतर्गत विविध उपक्रम शाळेत घेण्यात येतात. शाळेतील विद्यार्थ्यांना आपल्या अभ्यासाचा आढावा घेणे खुप आवश्यक असते. शिक्षक संपूर्ण महीनाभर अध्यापन करून विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी प्रयत्न करतात. याचाच एक भाग म्हणजे साप्ताहीक चाचणी. साप्ताहीक चाचणी मुळे विद्यार्थ्यांची गुणवत्ता, अक्षर, लेखन, आकलन आदी बाबींचा सराव होतो. जोधाप्रसादजी मोदी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयात दर महीन्याला चाचणी आणि विविध उपक्रम घेउन शाळेत निव्वळ अध्यापन आणि अध्ययन करण्यासोबतच याही उपकमाची जोड लावली जात आहे. आज झालेल्या बैठकीत पालकांनी शाळेत सुरू असलेल्या विविध उपक्रमाचे कौतुक करण्यासोबतच भविष्यातील विविध विद्यार्थ्यांच्या कल्याणकारी योजनांचे स्वागत केले. शिक्षक-पालक बैठकीमध्ये सर्व वर्गशिक्षकांनी आपल्या वर्गामध्ये विद्यार्थ्यांना आणि पालकांना त्यांच्या उत्तर पत्रिका दाखवून मार्गदर्शन केले. सर्व पालकांनी केलेल्या सुचनेप्रमाणे आणखी सुधारणा करण्याचे सर्व शिक्षक आणि शाळेचे मुख्याध्यापक तथा प्राचार्य मुंजे व्हि.ए. यांनी आश्वासन दिले. या बैठकीला विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या प्रमाणावर सहभागी झाले होते.

## महेश्वर येथे अहिल्यादेवी होळकर यांची पुण्यतिथी साजरी

अंबड । प्रतिनिधी

महेश्वर येथे पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुण्यतिथीनिमित्त १ सप्टेंबर रोजी होळकर राजघराण्याने पारंपरिक पद्धतीने पिंड दान पूजेचे आयोजन केले होते यावेळी होळकर राजघराण्याचे महाराजकुमार श्रीमंत शिवाजीराव होळकर व राजपुत्र यशवंतराव होळकर यांनी मातोश्री अहिल्यादेवींच्या समादीस पिंड दान अर्पण करून आदरांजली वाहिली.

सकाळी महेश्वर शहरातील प्रमुख चौकातून भव्य पालखी मिरवणूक काढण्यात आली, यात राजघराण्यासह विविध क्षेत्रातील नागरिक सहभागी झाले होते.पालखी मिरवणुकीनंतर राजगादीचे पूजन करून शेवटी पिंड नर्मदा नदीत प्रवाहीत करण्यात आले ही येथील प्राचीन आणि महत्त्वाची धार्मिक परंपरा आहे. यावेळी राजघराण्यांचे राजोपाध्याय, डॉ.विजय कवठेकर, होळकर पंचभैय्या चंद्रकांत होळकर, इतिहास अभ्यासक रामभाऊ लांडे, फडणीस हृषीकेश रणछोड, भीमसिंग ठाकूर आदी मान्यवर उपस्थित होते.



अहिल्यादेवी होळकर (३१ मे १७२५ - १३ ऑगस्ट १७९५) एक महान मराठा शासक होत्या, ज्यांनी त्यांच्या हयातीत माळवा प्रदेशात राज्य केले. त्यांचा जन्म महाराष्ट्रातील चौंडी गावात झाला.अहिल्यादेवींनी इंदूर आणि महेश्वरला तिची प्रशासकीय आणि सांस्कृतिक केंद्रे बनवली.त्यांच्या कारकिर्दीत महेश्वराने सांस्कृतिक आणि धार्मिक वारसा समृद्ध केला. ती धर्म, न्याय आणि प्रशासकीय कार्यक्षमतेसाठी ओळखली जात होती आणि तिने तिच्या आयुष्यात अनेक मंदिरे आणि धार्मिक स्थळे बांधली होती. १३ ऑगस्ट १७९५ रोजी त्यांचे निधन झाले आणि त्यांच्या योगदानाच्या स्मरणार्थ दरवर्षी त्यांच्या पुण्यतिथीनिमित्त विविध धार्मिक आणि सांस्कृतिक कार्यक्रम आयोजित केले जातात.

## नदी पात्राजवळ राहणाऱ्या नागरिकांनी काळजी घ्यावी - तहसीलदार चव्हाण

अंबड । प्रतिनिधी

अंबड घनसावंगी तालुक्यातील नागरिकांनी गोदावरी पात्र व नदी तलावा पासून सावधान राहावे असे आव्हान अंबडचे तहसीलदार विजय चव्हाण यांनी केले आहे. तसेच ते म्हणाले की नागरिकांनी कोणीही नदीपात्रामध्ये प्रवेश करू नये तसेच विसर्ग अलर्ट आहे

पाथरवाला उच्च पातळी बंधारा

पाथरवाला उच्च पातळी बंधारा जास्त क्षमतेने भरला असून पाणलोट क्षेत्रात होणाऱ्या पावसाच्या पाण्याची आवक बघता बंधाऱ्याचे २ द्वार उघडून नदीपात्रात साधारणतः ५५३३ क्यूसेक विसर्ग सोडण्याचे नियोजित आहे. येणाऱ्या पाण्याच्या आवक नुसार सोडण्यात येणाऱ्या विसर्गात वाढ करण्यात येऊ शकते. तरी सदर कालावधीत कुणीही नदीपात्रात प्रवेश करू नये व कुठलीही जिवीत व वित्त हानी होऊ नये या करिता प्रशासकीय स्तरावरून नदीकाठच्या गावांना सतर्कतेचा इशारा देण्यात अंबड तहसीलदार विजय चव्हाण व लघु पाटबंधारे उपविभाग अंबड त्यांच्याकडून करण्यात येत आहे



काल रात्रभर पासून सुरू असलेल्या पावसामुळे अंबड तालुक्यातील अनेक ठिकाणी १५१ ते २३३ एमएम पर्यंतचा पाऊस झालेला आहे त्यामुळे ओढे व नदीला पूर येऊन छोट्या पुलावरून पाणी गेल्याचे पाहणी दरम्यान दिसून आले

तसेच परिसरातील शेती पाहणी केली असता काही शेतामध्ये पुराचे पाणी गेल्याचे दिसून आले तसेच सध्या सर्व ठिकाणची पाण्याची परिस्थिती सामान्य असून पूर परिस्थिती ही वसरलेली आहे गोदावरी नदीमध्ये सुद्धा पाण्याचा विसर्ग सुरू असून जायकवाडी धरणातून भविष्यात विसर्ग सुरू होण्याबाबतच्या सूचना प्राप्त झालेले आहेत

तरी सर्व नदीकाठच्या जनतेला विनंती करण्यात येते की पूर असल्यास कोणत्याही परिस्थितीमध्ये नदी पार करण्याचा प्रयत्न करू नये तसेच वेळोवेळी देण्यात येणाऱ्या प्रशासनाच्या सूचनांचा पालन नागरिकांनी करावे यावेळी मंडळ अधिकारी काटकर नायब तहसीलदार महेंद्र गिरगे हसनापूर भद्रायणी साडेगाव अंतरवाली सराटी नालेवाडी शहागड वडीगोद्री व परिसरात प्रत्यक्ष घटनेस तळी जाऊन पाहणी केली.

पान ६ वरून...

### सततच्या पावसामुळे नागरीकांनी

लहान मुलांची उचित काळजी घ्यावी, असे ही प्रशासनातर्फे सुचित करण्यात आले आहे. या पावसामुळे जिल्ह्यात शेतीपिकांचे नुकसान झाल्याची शक्यता नाकारता येत नाही. शासन आदेश क्रमांक सीएलएस-२०२३/प्र.क्र.२६०/म-३ दिनांक २२.०७.२०२४ नुसार जिल्ह्यामध्ये ज्या महसुली मंडळात अतिवृष्टी झाली आहे किंवा यापुढे होईल, त्या जिल्ह्यातील शेतीपिकांचे पंचनामे विहित कार्यपद्धतीनुसार तातडीने करण्याबाबत सूचना प्राप्त झाल्या आहेत. त्यानुसार बीड जिल्हाधिकारी कार्यालयाच्या दिनांक २९.०७.२०२४ नुसार जिल्हयात अतिवृष्टीने शेतीपिकांचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास शेतीपिकांचे पंचनामे करण्याबाबत जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी, उपविभागीय अधिकारी सर्व, तहसिलदार सर्व यांना कळविले असल्याचे प्रसिद्धी पत्रकात लिहीले आहे.

## ईश्वर मानवतेच्या बाजूने : जुलूम व अत्याचाराला अजिबात सहन करीत नाही- क़वी फ़लाही

जालना । प्रतिनिधी

ईश्वर हा मानवतेच्या बाजूने जुलूम आणि अत्याचाराला अजिबात सहन करत नाही. असे प्रतिपादन जमात ए इस्लामी हिंद औरंगाबाद येथील मौलाना अब्दुल क़वी फ़लाही यांनी केले.

जमात ए इस्लामी हिंद चे सहामाही एकदिवसीय प्रशिक्षण शिबीर काल रविवार दिनांक १ सप्टेंबर रोजी येथील सिटी लॉन्स मध्ये आयोजित करण्यात आले होते.याप्रसंगी क़वी फ़लाही आपल्या अध्यक्षीय समारोपप्रसंगी बोलत होते.

पुढे बोलताना फ़लाही म्हणाले की ईश्वराचे कार्य तुमच्या वाचून अडून राहणार नाही. तो तुमच्या ठिकाणी दुसऱ्या लोकांना मैदानात उतरवू शकतो आणि दुसऱ्या लोकांना संधी देऊ शकतो. तुमच्याकडून अशी अपेक्षा आहे की आहे त्या परिस्थितीत तुम्हाला उपलब्ध असलेल्या साधनसामग्रीच्या बळावर मैदानात उतरावे लागेल. मनुष्याचे अपंगत्व किंवा त्याची विकलांगता व अडीअडचणी ईश्वराकडून टाकण्यात आलेल्या समाजप्रबोधनाच्या कार्यात अडसर ठरू शकत नाही.आज विशेष करून नव्या पिढीवर विशेष लक्ष देण्याची गरज आहे. कारण आज वामार्गाकडे तरुण वर्ग झपाट्याने जात आहे. व्यसनाधीनता,जुगार आणि व्याभिचार मोठ्या प्रमाणावर बोकाळला आहे.असेही ते म्हणाले.जालना,अंबड आणि बदनापूर या तिन्ही तालुक्यांना मिळून दोन सत्रात आयोजित करण्यात आलेल्या या एक दिवसीय प्रशिक्षण शिबीराच्या पहिल्या सत्राची सुरूवात सकाळी



१०:०० वाजता मौलाना अब्दुल क़वी फ़लाही यांच्या पवित्र कुरआन प्रवचनाने झाली. त्यानंतर जमात ए इस्लामी हिंद जालना जिल्हाध्यक्ष सय्यद शाकिर यांनी आपल्या प्रास्ताविकात कार्यक्रमाची रुपरेषा मांडली. त्यानंतर मौलाना बशीर अहेमद राही यांनी जमात ए इस्लामीचा परिचय आणि उद्देश काय यावर मार्गदर्शन केले. जमात ए इस्लामीशी माझे संबंध आणि याबाबतीत माझे पुढील धोरण या विषयावर अब्दुल कुद्दूस घनसावंगी, हाकिम पटेल अंबड, आस्मा बाजी जालना, नाज़नीन बाजी जालना यांनी आपापल्या प्रतिक्रिया मांडल्या. जमात ए इस्लामी हिंदच्या वतीने देश पातळीवर राबविण्यात येणारी आगामी मोहीम '' नैतिक मुल्यांचे संगोपन - वास्तविक स्वातंत्र्याची हमी '' या मोहिमेबद्दल जमात ए इस्लामी हिंद महिला शाखेच्या औरंगाबाद जिल्हाध्यक्ष शाहिस्ता परवीन यांनी सविस्तर माहिती दिली. देशातील सद्यस्थिती मध्ये समाज प्रबोधनाची दिशा आणि कार्यप्रणाली या विषयावर जमात ए इस्लामी हिंद राज्य सल्लागार समितीचे सदस्य शेख अब्दुल मुजिब यांनी आपले विचार मांडले.त्यानंतर दुपारच्या भोजनानंतर ठिक २:३० वाजता सदर शिबीराच्या दुसऱ्या सत्राला सुरूवात झाली. यामध्ये मुस्लिम महिलांच्या सक्रियतेचा मार्ग या विषयावर जमात ए इस्लामी हिंद जालना महिला शाखेच्या अध्यक्ष अम्मारा फिरदौस यांनी सखोल मार्गदर्शन केले. त्यानंतर '' आमच्या कार्याची गति - वर्तमान काळात आणि भविष्यात '' या विषयावर एक चर्चासत्र घेण्यात आले. सदर चर्चासत्राचे नेतृत्व स्टुडंट्स इस्लामीक ऑर्गनायझेशन ऑफ इंडिया जालना शहराध्यक्ष अथर नवीद यांनी केले. या चर्चासत्रात जमात ए इस्लामी हिंद जालना शहराध्यक्ष शेख इस्माईल, अंबड शहराध्यक्ष मौलाना सादेख मज़ाहिरी, बदनापूर शहराध्यक्ष मुख्तार खान, मुव्हमेंट फॉर पीस एन्ड जस्टिसचे जालना जिल्हाध्यक्ष शेख इब्राहिम, जालना महिला शाखेच्या शहराध्यक्ष अम्मारा फिरदौस तसेच अंबड महिला शाखेच्या खिज़र ज़मानी इत्यादींनी सहभाग घेतला. कार्यक्रमाच्या पहिल्या सत्राचे सुत्रसंचलन गाज़ी तारिक नदवी यांनी तर दुसऱ्या सत्राचे सुत्रसंचलन शेख युसूफ बदनापूर यांनी केले.यावेळी जालना,अंबड आणि बदनापूर तालुक्यातील जमात ए इस्लामी हिंदच्या कार्यकर्त्यांसोबतच युथ मुव्हमेंट ऑफ महाराष्ट्र, एस आय ओ, एम पी जे, जी आय ओ तसेच ए पी सी आर चे महिला व पुरुष कार्यकर्ते मोठ्या प्रमाणावर उपस्थित होते.




cmyk

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
मंगळवार दि.३ सप्टेंबर २०२४
४

# राज्यात लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढतोय; वेळीच करा 'हे' उपाय

महाराष्ट्रात परत एकदा लंपी रोगाचा प्रादुर्भाव वाढताना दिसून येत आहे. जनावरांना होणारा हा संसर्गजन्य रोग कधीकधी त्यांच्यासाठी प्राणघातक ठरू शकतो. मागील दोन वर्षापासून या रोगाने देशात थैमान घातलेला होता. आता परत या रोगाचा प्रादुर्भाव राज्यात आढळून येत आहे.

लंपी रोगामुळे जनावरांच्या त्वचेवर आणि शरीराच्या इतर भागांवर गाठी आणि व्रण येऊन आतून पोखरणाऱ्या या रोगामुळे पशुधनाची मोठ्या प्रमाणात हानी होते. त्यामुळे शेतकऱ्यांसह पशुपालकांनी जनावरांना वेळीच प्रथमोपचार आणि लसीकरण करून घेण्याचा सल्ला पशुवैद्यकीय तज्ज देत आहेत. या रोगाचा प्रसार माशा, डास, गोचीड, कीटक, चिलटे यांच्या मार्फत होतो.

निरोगी जनावर बाधित जनावराच्या संपर्कात निरोगी जनावर आल्यावर सुद्धा या रोगाचा प्रसार होतो. जनावरांचे बाधित अश्रु, वीर्य, चारा यामुळे



सुद्धा रोगाची वाढ झपाट्याने होते. बाधित गाभण जनावराच्या जन्माला येणाऱ्या वासरास तसेच दूध पिणाऱ्या वासरास बाधित गायीच्या दुधातून किंवा सडावरील जखमेतील स्रावातून बाधा होऊ शकते.

लंपी रोगाची जनावरात दिसणारी लक्षणे : या आजारामुळे जनावरांच्या डोळयातून व नाकातून पाणी येते. चारा खाणे आणि पिणे कमी होते. ताप येतो, दुधाचे प्रमाण कमी होते, चारा खाणे, पाणी पिणे कमी होते.

अशी घ्या जनावरांची काळजी : प्रतिबंधात्मक उपाय म्हणून पशुवैद्यकाकडून लसीकरण करून घ्यावे. जनावरांचा गोठा स्वच्छ ठेवा, जनावरांना गोचीड यापासून मुक्त ठेवावे. बाजारातून विकत आणलेले जनावरे इतर गुरांपेक्षा वेगळी ठेवावीत. त्यांना जवळपास महिनाभर लांब अंतरावर बांधावे. लम्पीची बाधा झाल्यास तात्काळ पशु तज्ज्ञाकडून उपचार करून घ्यावेत. चिलटे, माश्या, गोचीड आणि डासांद्वारे लम्पी रोगाचा फैलाव होतो. गोठ्यातील भिणभिणणाऱ्या माशांचा बंदोबस्त करावा. जनावरांच्या शरीरावर झालेल्या जखमा २ टक्के पोटॅशिअम परमँगनेटच्या पाण्याने धुऊन त्यावर बोरोग्लिसरीन लावावे.

## पावसाळ्यात शेतातील कापसाचे व्यवस्थापन

कपाशीच्या झाडावर दिसणारे परिणाम हे जमिनीत किती काळ पाणी साचले आहे आणि कपाशीच्या झाडाचे वय किती या दोन गोष्टींवर ठरत असतात. कपाशी मुळांची वाढ सुरुवातीच्या काळात जोरदार असते. कपाशीची मुळे सुमारे १०० सेंमी खोलवर जात असल्याने मध्यम ते खोल अशा काळ्या मातीत कापूस पीक मोठ्या प्रमाणावर घेतले जाते. अशा जमिनीची पाणी धरून ठेवण्याची क्षमता जास्त असते. अशा जमिनीत पावसाचे पाणी साचण्याची समस्याही अधिक असते.

पाणी साचलेल्या जमिनीतून पिकाला नत्र, स्फुरद आणि पालाश यासारखी अन्नद्रव्ये घेणे कठीण होते. झाडे कमकुवत व पिवळी दिसू लागतात. पाने मोठी होत नाहीत. पावसाचा मोठा खंड व त्यानंतर अचानक मोठा पाऊस झाला की नैसर्गिक पातेगळ मोठ्या प्रमाणावर होते. त्यामुळे झाडाची कायिक वाढ जास्त होऊन कपाशी काढणीला नेहमीपेक्षा उशीर होण्याची शक्यता असते. अपरिपक्व धाग्यांचे प्रमाण वाढून धाग्यांच्या गुणवत्तेवर विपरीत परिणाम होतो. मोठ्या पावसामुळे वातावरणात वाढलेल्या आर्द्रतेमुळे मर रोग (पॅराविल्ट), पातेगळ व बोंडसड या सारख्या समस्या दिसून येतात.



पाण्याच्या निचऱ्यासाठी उपाययोजना :

प्रथम कपाशी पिकातील अतिरिक्त पाण्याचा तत्काळ निचरा करण्याकडे लक्ष द्यावे. ओल्या मातीमध्ये केलेल्या उपायांना झाड फारसे प्रतिसाद देत नाही. त्यामुळे लवकरात लवकर जमीन कशी कोरडी होईल, हे पाहावे. पाण्याचा निचरा होण्यासाठी उताराला समांतर चर काढून साचलेले पाणी शेताबाहेर काढावे. मुळात वरंब्यावर कपाशीची लागवड केलेली असल्यास अधिकचे पाणी सरी मधून निघून जाईल. शेतात खोदलेले चर मोकळे करावेत त्यामुळे पाण्याचा योग्य निचरा होईल. सखल भागातील पाण्याला वाट करून द्यावी. शक्य असेल तर साचलेले पाणी बाहेर उपसून बाहेर काढावे. वाफसा येताच कोळपणी व खुरपणी करावी.

कपाशी पोषणासाठी उपाययोजना : झाडावर (१ टक्का) या प्रमाणात १९:१९:१९ किंवा डाय अमोनिअम फॉस्फेट (१ टक्का) म्हणजे १० ग्रॅम प्रति लिटर पाणी या प्रमाणे सात दिवसांच्या अंतराने फवारणी करावी. पिकांच्या पोषणास मदत होते. कपाशीची झाडे शेंडा खुडण्याच्या अवस्थेत असल्यास शेंडा खुडण्याचे काम ७ दिवसांनी लांबवावे. कारण पाणी साचल्यामुळे कपाशीची वाढ मंद झालेली असते. त्यात शेंडा खुडल्यास त्यानंतर अपेक्षित असलेली फळ फांद्यांची वाढ मिळणार नाही. बोंडाच्या वजनातील अपेक्षित वाढ मिळू शकत नाही. या हंगामात अति पावसामुळे गंभीर परिस्थिती असली तरी अन्य पिकांच्या तुलनेने कापूस एक लवचिक व काटक वनस्पती आहे. शेतकरी कपाशी झाडाच्या वाढीसाठी अनावश्यक संप्रेरकाच्या फवारणीची घाई करतात. हे टाळावे. एकदा माती सुकली आणि सूर्यप्रकाश मिळाला की कपाशी पीक सामान्यपणे पुन्हा वाढू लागेल. पोषणाच्या समस्या कमी होण्यास मदत होते.

## शेळ्यांसोबत कुक्कुटपालन शेतकऱ्यांच्या फायद्याचे

पशुपालन हा उत्तम जोडव्यवसाय आहे. पण काही जोडव्यवसाय एकमेकांना पूरक सुद्धा असतात. हे व्यवसाय एकत्रित केल्यावर शेतकऱ्यांना फायदा होऊन त्यांचे उत्पन्न सुद्धा वाढते. असाच एक पशुपालनातील पूरक व्यवसाय आहे शेळी-कुक्कुटपालन.

शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होतो आणि नफा वाढतो. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो आणि अंडी आणि कोंबडीचे मांस सुद्धा मिळते. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीपालन ग्रामीण अर्थव्यवस्थेत विशेष महत्त्वाचे आहे, कारण ते अनेक लोकांसाठी कमाईचे मुख्य साधन आहे. परंतु शेतकऱ्यांनी शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्यास त्यांचा खर्च कमी होऊन नफाही वाढतो. देशभरातील अनेक शेतकरी अजूनही गायी, म्हशी आणि शेळ्यांसोबत कोंबडी पाळत आहेत. शेळ्यांसोबत कोंबडी पाळल्याने खर्च निम्म्यावर येतो. अशा प्रकारे पशुपालक कमी खर्चात चांगला नफा मिळवू शकतात. शेळीचे शेण आणि कोंबडीची विष्ठा वापरून शेतकरी सेंद्रिय खत निर्माण करू शकतात.



कोंबड्या आणि शेळ्यांचे एकत्र पालन : एकत्र कुक्कुटपालन आणि शेळीपालनासाठी, सर्वप्रथम एक विशेष प्रकारचे शेड तयार करावे लागेल ज्यामध्ये कोंबड्या आणि शेळ्या एकत्र राहू शकतील. या शेडचे दोन भाग करण्यासाठी मधोमध लोखंडी जाळी लावून कोंबड्यांना बाहेर येण्यासाठी छोटा दरवाजा करावा. शेळयांना चरण्यासाठी बाहेर घेऊन शेडमध्ये साफसफाईसाठी जाताना जाळीत बसवलेले छोटे गेट उघडले पाहिजे. गेट उघडल्यानंतर कोंबड्या शेळ्यांच्या जागी येतात. शेळ्यांच्या शेडमध्ये उरलेला चारा कोंबड्या मोठ्या उत्साहाने खातात.

कोंबडीच्या खाद्याच्या किमतीत कपात : शेळ्यांना बरसीम, कडुनिंब, सायकमोर, जामुन आणि पेरू यांसारखा हिरवा चारा तसेच औषधी मुल्याचा चारा दिला जातो, ज्यामुळे शेळ्यांना अनेक मोठ्या आजारांपासून संरक्षण मिळते. शेळ्यांनी खाऊन उरलेला चारा फेकून दिल्यानंतर कोंबड्या खातात. कोंबडी एका दिवसात ११० ते १३० ग्रॅम धान्य खाते. त्याचबरोबर कोंबड्या आणि शेळयांचे पालन केल्याने कोंबडीच्या खाद्याचा खर्च ३० ते ४० ग्रॅमने कमी होतो.

कार्बन डायऑक्साइडच्या माध्यमातून कंपोस्ट खत निर्मिती : एक एकरावर शेळ्यांसोबत कोंबड्या पाळल्या तर शेळ्यांच्या खतापासून कंपोस्ट खतही तयार करता येईल. हे तयार केलेले कंपोस्ट तुम्ही शेळ्यांसाठी चारा निर्मितीसाठी वापरू शकता. याद्वारे पूर्णपणे सेंद्रिय चारा पिकवू शकाल. याशिवाय तुम्ही या कंपोस्टपासून चांगल्या प्रथिनांसह अॅझोला देखील वाढवू शकता.

## जाणून घ्या लवकर वाढणारी नगदी पिके!

नगदी पिके वाढवून झटपट नफा मिळवण्यासाठी, काळजीपूर्वक नियोजन करणे, बाजारातील मागणी समजून घेणे आणि लहान वाढीचे चक्र असलेली पिके निवडणे आवश्यक आहे. अनेक पिके जलद परतावा देणारे सिद्ध झाले आहेत, ज्यामुळे कमी वेळात जास्तीत जास्त नफा मिळवू पाहणाऱ्या शेतकऱ्यांसाठी अशी पिके आदर्श आहेत. तुमच्याकडे विस्तीर्ण शेतजमीन असो किंवा छोटी बाग असो, ही पिके ताज्या, उच्च-गुणवत्तेच्या उत्पादनांची वाढती मागणी पूर्ण तर करतातच शिवाय चांगला नफा सुद्धा मिळवून देतात.

टोमॅटो : टोमॅटो पीक लागवडीपासून कापणीपर्यंत ६०-८० दिवसात तयार होते. ताज्या टोमॅटोला बाजारपेठेत आणि अन्न प्रक्रिया उद्योगांमध्ये सतत मागणी असते. योग्य सिंचन प्रणाली आणि कीटक नियंत्रणासह, आपण स्थिर उत्पन्न देणारे हे पीक वर्षातून अनेक वेळा घेऊ शकतो. याव्यतिरिक्त, टोमॅटो हे विविध हवामानात घेतले जाऊ शकते, ज्यामुळे ते जलद नफ्यासाठी एक विश्वासार्ह पीक आहे.

लसूण : लसूण पिकास पक्व होण्यास सुमारे सहा महिने लागत असले तरी, लसणाची प्रति किलोग्रॅम किंमत जास्त आहे. लसणाची देखभाल तुलनेने कमी असते आणि एकदा कापणी केल्यावर ते अनेक महिने साठवून ठेवता येते, ज्यामुळे बाजारभाव त्यांच्या शिखरावर असताना शेतकर्यांना ते विकता येतात. औषधी गुणधर्म आणि जगभरातील विविध पाककृतींमध्ये वापर यामुळे मागणी जास्त आणि वर्षभर असते.

आले : आले या पिकाला जागतिक बाजारपेठेत दिवसेंदिवस मागणी वाढत आहे, विशेषत: फार्मास्युटिकल आणि अन्न उद्योगांमध्ये. या पिकाचा



कालावधी साधारण ८-१० महिने असतो. आले हे पीक भांडी किंवा कंटेनरमध्ये वाढवणे देखील शक्य आहे, ज्यामुळे ते मर्यादित जमीन असलेल्या शेतकर्यांसाठी सुलभ पीक बनते. नैसर्गिक आणि सेंद्रिय उत्पादनांना जागतिक मागणीमुळे हे जलद नफ्यासाठी सर्वोच्च पर्याय आहे.

मशरूम : मशरूम हे एक उच्च मूल्य गुणधर्म असलेले पीक आहे जे लहान जागेतही घेतले जाऊ शकते. शहरी भागात शेती करणार्यांसाठी हा एक चांगला पर्याय आहे. मशरूम जलद वाढते, काही जाती फक्त तीन आठवड्यांत कापणीसाठी तयार होतात. मशरूमला केवळ खाद्य म्हणूनच नाही तर त्यांच्या पौष्टिक फायद्यांमुळे आरोग्य क्षेत्रातही मागणी आहे. योग्य सेटअपसह, लहान जागेत भरीव पीक मिळू शकते आणि सतत कापणी चक्रासह, मशरूममुळे उत्पन्नात सातत्य राखता येते.

मिरची : तिखट आणि ढोबळी मिरची ही उत्कृष्ट नगदी पिके आहेत कारण त्यांना ताजी आणि प्रक्रिया दोन्ही प्रकारात जास्त मागणी आहे. मिरची पिकाचा कालावधी ६०-९० दिवसांचा असतो. ताज्या वापरापासून ते वाळलेल्या मिरच्या, मसाल्या आणि सॉसपर्यंत मिरचीचा वेगवेगळ्या प्रकारे वापर आहे. विविध परिस्थिती आणि कीटकांना प्रतिबंधक, यामुळे हे पीक जलद आणि लक्षणीय नफा मिळवून देऊ शकते.

लेट्यूस : कोशिंबिरीसाठी वापरण्यात येणारी ही पालेभाजी एक जलद वाढणारे पीक आहे जे ३०-६० दिवसांत काढले जाऊ शकते. जलद उलाढाल आणि नफ्यासाठी हे एक आदर्श पीक आहे. सॅलड्ससाठी या मुख्य पालेभाजी पिकाला वर्षभर सतत मागणी असते, विशेषत: शहरी बाजारपेठांमध्ये. ही कोशिंबीर पालेभाजी वेगवेगळ्या पद्धतीने लागवड करता येते, जसे ग्रीनहाऊस आणि हायड्रोपोनिक प्रणाली. या पिकाचा कालावधी लहान असल्यामुळे तुम्ही वर्षातून अनेक वेळा हे पीक घेऊ शकता आणि नफा कमवू शकता.

स्ट्रॉबेरी : स्ट्रॉबेरी हे एक अत्यंत फायदेशीर पीक आहे, विशेषत: जर तुम्ही सेंद्रिय पद्धतीने या पिकाचे ताजे उत्पादन घेत असाल तर तुम्ही बाजारात या पिकातून चांगला नफा मिळवू शकता. ४-६ महिन्यात येणारे हे पीक योग्य परिस्थितीत सातत्यपूर्ण उत्पादन देऊ शकते. ताज्या स्ट्रॉबेरीला बाजारपेठांमध्ये तसेच जॅम, जेली आणि मिष्टान्न बनवण्यासाठी मागणी आहे. याची लागवड खुल्या शेतात किंवा कंटेनर सिस्टीममध्ये सुद्धा करता येते. उच्च बाजारभाव, विशेषत: सेंद्रिय उत्पादन यामुळे शेतकर्यांना गुंतवणुकीवर चांगला परतावा मिळतो.

बेसिल/तुळस : बेसिल सारख्या औषधी वनस्पतींना सध्या जास्त मागणी आहे, विशेषत: शहरी भागात. बेसिल घरामध्ये किंवा बाहेर उगवता येते आणि त्याचे वाढीचे चक्र फक्त ४-६ आठवडे असते. हे स्वयंपाकामध्ये मोठ्या प्रमाणावर वापरले जाते, विशेषत: इटालियन आणि भूमध्यसागरीय पाककृतींमध्ये. जलद वाढ आणि अनेक वेळा कापणी करण्याच्या क्षमतेमुळे, जलद नफा मिळवू पाहणाऱ्यांसाठी बेसिल हे एक योग्य पीक आहे.

मुळा : मुळा हे सर्वात वेगाने वाढणाऱ्या पिकांपैकी एक आहे, काही जाती ३-४ आठवड्यांपर्यंत परिपक्व होतात. हे पीक घेण्यास सोपे असून त्यांना कमीतकमी जागेची आवश्यकता आहे, ज्यामुळे ते लहान शेतकर्यांसाठी आदर्श पीक आहेत. मुळा कमीतकमी गुंतवणुकीत जलद नफा देऊ शकतात.




### महत्वाच्या घटना

३०१: ३०१ई.पूर्व : जगातील सर्वात जुने प्रजासत्ताक राष्ट्र सॅन मरीनो स्थापित झाले.
१७५२ : अमेरिकेत ग्रेगरीयन कॅलेंडरचा वापर सुरू झाला.
१९१६ : श्रीमती ॲनी बेझंट यांनी 'होमरुल लीग'ची स्थापना केली.
१९२१: बेल्जियम देशांत कम्युनिस्ट पक्षाची स्थापना करण्यात आली.
१९३५ : सर मॅल्कम कॅम्पबेल ताशी ३०० मैल पेक्षा जास्त जोरात ऑटोमोबाईल चालवणारे पहिले व्यक्ति झाले.
१९३९ : जर्मन सम्राट हिटलर यांच्या पोलंड, ब्रिटन आणि फ्रान्सवर केलेल्या हल्ल्याला प्रती उत्तर म्हणून, सत्ता गाजविलेल्या राष्ट्राच्या दोन्ही मित्रपक्षांनी जर्मनीविरुद्ध युद्धाची घोषणा केली.
१९७१ : कतारला स्वातंत्र्य मिळाले.
२००४ : भारतीय पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी आणि पाकचे अध्यक्ष परवेझ मुशर्रफ यांच्यात या वर्षाच्या सुरुवातीच्या काळात नाजूक शांतता वाढत असताना, भारत आणि पाकिस्तानच्या परराष्ट्र मंत्र्यांनी दिल्ली येथे बैठक घेऊन शांततेचा करार केला.
२०१८ : उपराष्ट्रपती व्यंकय्या नायडू यांनी लिहिलेल्या "मुव्हिंग ऑन मुव्हिंग फोरवर्ड : ए इयर इन ऑफिस" या पुस्तकाचे पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले.
२०१९ : भारतातील मध्य प्रदेश राज्यातील भोपाळ या शहरात सुरु असलेल्या राष्ट्रीय स्पर्धांमध्ये वरिष्ठ राष्ट्रीय जलतरण स्पर्धेत ५० मीटर बटरफ्लाय प्रकारात वीर धवल खाडे व दिव्या सतीजा यांनी राष्ट्रीय विक्रमासह सुवर्णपदक पटकावले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६१७ : मुघल सम्राट शाहजहां आणि त्यांची पत्नी मुमताज महल यांची दुसरी मुलगी रोशनारा बेगम यांचा जन्मदिन.
१८५५ : पंत महाराज बाळेकुन्द्री आध्यात्मिक गुरू (मृत्यू: १६ आक्टोबर १९०५)
१८७५ : फर्डिनांड पोर्श ऑस्ट्रियन वाहन अभियंता (मृत्यू: ३० जानेवारी १९५१)
१९०५ : नोबेल पारितोषिक विजेते अमेरिकन रसायनशास्त्रज्ञ कार्ल डेव्हिड अँडरसनयांचा जन्म.
१९०५ : भारतीय राजकारणी, लेखक, पत्रकार आणि स्वातंत्र्यसैनिक कमलापती त्रिपाठी यांचा जन्मदिन.
१९२३ : कृष्णराव तथा 'शाहीर' साबळे संगीत नाटक अकादमी तसचं पद्मश्री पुरस्कार सन्मानित महाराष्ट्रीयन मराठी शाहीर. 'महाराष्ट्राची लोकधारा' या आपल्या कार्यक्रमातून लावणी, कोकेवाला (ग्रामीण भागात सारंगीसारखे वाद्य वाजवून देवादिकांची आख्याने गाणारा), बाल्यानृत्य (मुंबईत उपाहारगृहांत, धनिकांकडे, तसेच चाळींतील लोकांकडे कामाला असलेल्या कोकणी गड्यांचेबाल्यांचेनृत्य), कोळीनृत्य, गोंधळीनृत्य, मंगळागौर, वाघ्यामुरळी, वासुदेव, धनगर इत्यादींचे जिवंत दर्शन ते घडवत असत. या कार्यक्रमाला अफाट लोकप्रियता मिळाली होती (मृत्यू: २० मार्च २०१५)
१९२३ : टाको बेल चे संस्थापक ग्लेन बेल यांचा जन्म. (मृत्यू: १६ जानेवारी २०१२)
१९२६ : भारतीय बंगाली व हिंदी चित्रपट अभिनेते उत्तम कुमार यांचा जन्मदिन.
१९२७ : अरुण कुमार चटर्जी तथा 'उत्तम कुमार' बंगाली व हिन्दी चित्रपट अभिनेते (मृत्यू: २४ जुलै १९८०)
१९३१ : श्याम फडके नाटककार ('काका किशाचा', 'तीन चोक तेरा', 'राजा नावाचा गुलाम' फेम)
१९३८ : नोबेल पारितोषिक विजेते जपानी रसायनशास्त्रज्ञ रायोजी नोयोरी यांचा जन्म.
१९४० : प्यारेलाल रामप्रसाद शर्मा चित्रपटसृष्टीत चार दशके लोकप्रिय संगीत देणार्या 'लक्ष्मीकांत-प्यारेलाल' या जोडीतील संगीतकार
१९५६ : भारतीय अभिनेते आणि दिग्दर्शक जिष्णु दासगुप्ता यांचा जन्म. (मृत्यू: २१ डिसेंबर २०१२)
१९५७ : भारतीय योग गुरु व सद्गुरू नावाने प्रख्यात ईशा फाउंडेशनचे संस्थापकजग्गी वासुदेव यांचा जन्मदिन.
१९६५ : अमेरिकन अभिनेता चार्ली शीन यांचा जन्म.
१९७१ : भारतीय-अमेरिकन लेखक किरण देसाई यांचा जन्म.
१९७४ : भारतीय क्रिकेटपटू राहुल संघवी यांचा जन्म.
१९७६ : विवेक ओबेरॉय अभिनेता
१९९२ : राजीव गांधी खेलरत्न पुरस्कार व पद्मश्री पुरस्कार सन्मानित भारतीय कुस्तीपटू महिला साक्षी मलिक यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१९५३ : लक्ष्मण तथा 'खाप्रुमामा' पर्वतकर तबला, घुमट व सारंगीवादक. गोव्यातील 'घुमट' हे तालवाद्य ते अत्यंत कौशल्याने वाजवत. त्यांनी लयकारीमध्ये विविध, नावीन्यपूर्ण व आश्चर्यजनक प्रयोग केले आणि तालाच्या जाणकारांमध्ये लौकिक संपादन केला. दिलेल्या मूळच्या लयीत कोणतीही पट ते लीलया करीत असत. त्याचप्रमाणे ते एकाच वेळी एका पायाने त्रिताल, दुसऱ्या पायाने झपताल, एका हाताने लय, दुसऱ्या हाताने चौताल धरून तोंडाने सवारीचा ठेका म्हणत असत. तोंडाने विशिष्ट बोलांची तीन आवर्तने करत असतानाच ते त्याच वेळी तबल्यावर पाच वेळा तोच बोल वाजवून दोन्हींची सम अचूक साधत असत आणि हे करताना लयीची यत्किंचितही ओढाताण झालेली दिसून येत नसे. एखादी परण तोंडातून उलटी म्हणत असतानाच तबल्यावर सुलटी वाजवून ते समेवर बरोबर येत. त्यांनी पावणेसोळा मात्रांचा 'परब्रह्म' ताल रचून त्यात पाव मात्रेचे १२५ 'धा' असलेली 'महासुदर्शन' नामक परण बांधली. या त्यांच्या अद्भुत व अद्वितीय लयसिद्धीमुळेच त्यांना ख्यातनाम गायक अल्लादियाखाँ यांनी 'लयब्रह्मभास्कर' ही पदवी देऊन त्यांचा यथोचित गौरव केला. (जन्म: १८८०)
१९५८ : माधव केशव काटदरे निसर्गकवी (जन्म: ३ डिसेंबर १८९२)
१९६७ : अनंत हरी गद्रे तथा समतानंद वार्ताहर, संपादक, थोर समाजसुधारक आणि नाटिका संप्रदायाचे प्रवर्तक, जाहिरातशास्त्रातील तज्ञ. 'मौज' आणि 'निर्भिड' ही साप्ताहिके त्यांनी सुरू केली. जातीयता निर्मूलनासाठी त्यांनी सहभोजनाचा (त्या काळातील धाडसी) उपक्रम चालवला. (जन्म: १६ आक्टोबर १८९०)
१९९१ : अमेरिकन चित्रपट दिग्दर्शक फ्रँक काप्रा यांचे निधन.
२००० : पांडुरंग पुरुषोत्तम शिरोडकर स्वातंत्र्यसैनिक, गोवा विधानसभेचे पहिले सभापती
२०१४ : भारतीय राजकारणी ए. पी. वेंकटेश्वरन यांचे निधन. (जन्म: २ ऑगस्ट १९३०)

# वडवणीच्या ग्रामीण रुग्णालय इमारतीसाठी १५ कोटीच्या निधीला मान्यता

वडवणी । प्रतिनिधी

गेल्या दहा वर्षापुर्वीच तत्वत मान्यता मिळालेल्या वडवणी ग्रामीण रुग्णालयाच्या इमारत बांधकामासाठी शासनाकडून तब्बल १४ कोटी ९४ लक्ष ५० हजार रुपायच्या खर्चास मान्यता मिळाली आहे. यामुळे आता शहरासह तालुक्यातील जनतेचा आरोग्याचा प्रश्न मिटणार आहे. तर आ. प्रकाशदादा सोळंके यांचे विकासात्मक 'व्हिजन' आणि शहराचे कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांचा याबाबतचा 'पाठपुरावा' जनतेच्या आरोग्य प्रश्नी कामी आला असून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणी लवकरच इमारत बांधकामास प्रारंभ होईल असा विश्वास देखील व्यक्त केला जात आहे.

वडवणी शहरात ग्रामीण रुग्णालयाची आवश्यता दृष्टीकोनातून सन २०१४ साली आ. प्रकाश सोळंके यांनी तात्कालीन सरकारकडून मान्यता आणली होती. यानंतर तब्बल १० वर्ष या प्रश्नासाठी संघर्ष करावा लागला होता. सदरील प्रश्न गंभीरतेनी घेऊन वडवणी नगरीचे कर्तव्यदक्ष नगराध्यक्ष शेषेराव जगताप यांनी आ. प्रकाश सोळंकेसह युवा नेते जयसिंह



सोळंके यांच्या मार्गदर्शनाखाली हा प्रश्न संचोटी आखत मार्गी लावला आहे. यामध्ये प्रथम सदरील जागा नावाची होण्यासाठी अडचणी निर्माण झाल्या होत्या या अडचणीचा सामना करत व अडचण दुर करुन सदरील जागा हि साधारण १५ ते २० दिवासांपुर्वी जिल्हा शल्यचिकित्सक यांच्या नावे केली आहे. आ. प्रकाश सोळंके यांनी ग्रामीण रूग्णालयाच्या इमारतीसाठी राज्य सरकारच्या सार्वजनिक आरोग्य विभागाकडून तब्बल १४ कोटी ९४ लक्ष ५० हजार रुपायाच्या अंदजपत्रकास मान्यता देखील मिळवून आणली आहे. याचा शासन निर्णय दि,२९ आँगस्ट २०२४ देखील निघाला असून लवकरच प्राथमिक आरोग्य केंद्राच्या ठिकाणीच शहरासह तालुक्यातील रुग्णांसाठी टोलेजग इमारत बांधकामासाठी सुरुवात होणार असून रुग्णासाठी सुसज्ज ग्रामीण रुग्णालय उभा राहिल अशा विश्वास आता जनतेमधून व्यक्त केला जात असून प्रथम व्हिजन आ. प्रकाश सोळंके यांनी मांडले सरकार कडून मान्यता मिळवली आहे. तर शेषेराव जगताप यांनी देखील या प्रश्नासाठी दिवसाचा रात्र आणि रात्रीचा दिवस करत पाठपुरावा केल्यामुळेच हा प्रश्न मार्गी लागला आहे हेही तेवढच खरं आहे.

### ग्रामीण रुग्णालय वरदान ठरेल

सध्या शहरासह तालुक्यातील रुग्णाना ऑक्सिजन, सिटी स्कॅन, सोनोग्राफी, किरकोळ ऑपरेशन, एक्स रे साठी बीड किंवा इतत्र ठिकाणी जावे लागत होते. यामुळे वेळेवर उपचार आणि अनर्थ पैसा देखील खर्च व्हायचा यामुळे अनेकदा रुग्णाची हेळसांड देखील व्हायची परंतू याठिकाणी लवकरच ग्रामीण रुग्णालय उभा राहिले तर रुग्णाच्या समस्याचा निपटणारा जिल्ह्याच्या ठिकाणी न जाता तालुक्याच्या ठिकाणी निभू शकतात आणि याच माध्यमांतून सदरील रुग्णालय हे आरोग्याच्या दृष्टिने वरदान देखील ठरणार आहे.

### आ. प्रकाश सोळंके कामी आले

सन २०१४ च्या विधासभा निवडणुकीच्या ऐन तोंडावरच आ. प्रकाश सोळंके यांनी वडवणीला ग्रामीण रुग्णालयाची मजुरी आणली आणि त्यांचा परभाव झाला होता. तेव्हापासून अनेक अडचणी आल्या होत्या. १५ दिवसांपुर्वीच या जागेचा प्रश्न मार्गी लागला आणि अवघ्या काही दिवसातच इमारत बांधकाम खर्चास मान्यता देखील मिळाली आहे. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाउले या म्हणे प्रमाणे आ.प्रकाश सोळंके कामी आले असल्याचे दिसून येत आहे.

## गाढे पिंपळगाव येथे बैलपोळा उत्साहात साजरा



परळी । प्रतिनिधी

तालुक्यातील गाढे पिंपळगाव येथे दरवर्षी प्रमाणे याहीवर्षी बैलपोळा परंपरेनुसार उत्साहात साजरा करण्यात आला. पाऊस सुरू असताना मिरवणूक काढण्यासाठी थोडी उसंत मिळाल्यानंतर हरहर महादेवच्या घोषणेत बैलांच्या भव्य मिरवणूका काढण्यात आल्या.

गाढे पिंपळगाव येथे बैलपोळा शेतकऱ्यांचा सण उत्साहात साजरा करण्यात आला. गाढे पिंपळगाव येथे प्रत्येक सणांचे मान गावपातळीवर परंपरेने ठरवण्यात आले आहेत, होळीचा मान शरदराव राडकर, दसऱ्याचा मान मार्तंडराव वाघमोडे, यांच्याकडे आहेत ही परंपरा गेले अनेक वर्षांपासून चालू आहे त्यानुसार बैलपोळ्याचा मान जि.प.चे माजी समाजकल्याण सभापती प्रभाकर वाघमोडे यांच्या कडे परंपरागत आहे. गावात सुरुवातीला वाघमोडे यांच्या बैलाची वाजत गाजत मिरवणूक काढली जाते. मारुती व महादेव मंदीराला पाच फेरी घालून गावात वेशीवर जे तोरण आहे हे त्यांच्या कडून तोडले जाते व संपूर्ण गावात ही मिरवणूक काढण्यात येते. त्यानंतर गावातील इतर सर्व शेतकऱ्यांच्या बैलांच्या मिरवणूका हरहर महादेवच्या घोषणा देत वाजत गाजत काढण्यात येतात. या वर्षी ही परंपरागत पध्दतीने पोळा साजरा करण्यात आला. यंदा पावसाळ्याच्या सुरुवातीपासून पाऊस चांगला झाल्याने सुगी चांगली आली आहे. शेतकरी बांधवांमध्ये उत्साह दिसून येत होता.

## थोडक्यात



### ढोले वस्ती येथे संगीतमय भागवत कथेचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

येथील रहिवासी कै.सुभाष उत्तमराव ढोले यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त बीड येथील सुप्रसिद्ध भागवत कथा प्रवक्ते राधेश्याम कृपांकित श्री ह.भ.प.सचिन महाराज सपकाळ यांच्या सुमधुर वाणीतून भागवत कथेचे आयोजन करण्यात आलेले आहे.या भागवत कथेची सुरुवात मंगळवार दि. ०३/०९/२०२४ रोजी होतं असून सांगता सोमवार दि.०९/०९/२०२४ रोजी होणार आहे. कथेची वेळ दररोज दुपारी ०१ ते०५ असून या संगीत भागवत कथेसाठी संगीत गायन साथ ह.भ.प.आई कुसुमताई सपकाळ, ह.भ.प. पवन महाराज सपकाळ, तबला साथ-ह.भ.प. जगन्नाथ महाराज कराळे यांची तर सिंथ व गायनसाथ ह.भ.प.माऊली महाराज घुमरे यांची लाभणार आहे.या सात दिवस चालणाऱ्या सप्तरंगी कथेचे श्रवण सर्व भाविक भक्त व माता भगिनी बाल गोपाळ व पंचक्रोशीतील भावीक भक्तांनी करावे असे आवाहन समस्त ढोले परिवार, ढोले वस्ती इमामपूर रोड बार्शी नाका बीड यांनी केले आहे.

### शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत द्या - एकनाथ मुंडे

परळी । प्रतिनिधी



बीड जिल्ह्यामध्ये होत असलेल्या दोन दिवसापासून सतत मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान होत आहे. अतिवृष्टी सदृश्य पाऊस झाल्याने पिकं वाहून गेली आहेत, काही ठिकाणी पाणी साचल्याने पिकांची नासाडी होऊन बसली. यामुळे बळीराजा आर्थिक संकटात सापडला असून, प्रशासनाने तत्काळ पंचनामे करून सरसकट आर्थिक मदत करावी अशी मागणी राष्ट्रवादी शरद पवार गटाचे जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ मुंडे यांनी केली आहे. याबाबत जिल्हाधिकारी बीड यांना लेखी निवेदन पाठविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी यांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, संपूर्ण बीड जिल्ह्यामध्ये दोन दिवसापासून मुसळधार पाऊस चालू असून त्यामुळे सोयाबीन कापूस मूग उडीद तूर असे अनेक पिकांचे नुकसान झालं आहे. सर्व शेत जमिनी खचून गेल्या आहेत नदीकाठच्या पिकांमध्ये मोठ्या संख्येने पाण्याचा प्रवाह निघून गेला आहे. हाती आलेला घास हा शेतकर्यांचा निघून गेला आहे. बळीराजा हा आसमानी आणि सुलतानी संकटात असून सदरील शासनाने याकडे लक्ष द्यावे तसेच जे उर्वरित शेतकऱ्यांचे पैसे आहेत तेसुद्धा शेतकऱ्यांच्या खात्यात त्वरित जमा करण्यात यावे. पावसाचे प्रमाण कमी झाल्यानंतर तत्कालीन पंचनामाचे आदेश देऊन शेतकऱ्यांचे सरसकट पंचनामे करून शेतकऱ्यांना पिक विमा तसेच शेतकऱ्यांना आर्थिक लाभाची भरीव मदत करण्यात यावी अशी मागणी जिल्हा उपाध्यक्ष एकनाथ मुंडे यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे केली आहे.

## पिकांचे पंचनामे करण्याचे पालकमंत्री मुंडे यांचे निर्देश

मुंबई । प्रतिनिधी

संपूर्ण बीड जिल्ह्यात ३१ ऑगस्ट पासून ते आतापर्यंत सातत्याने सर्वदूर पाऊस पडत असून जिल्ह्यातील जवळपास सर्वच जलाशय तुडुंब भरून नदी-नाले खळखळून वाहू लागले आहेत. जिल्ह्यावरील जलसंकट दूर झाल्याची बातमी जरी आनंददायक असली, तरी सततच्या पावसाने अतिवृष्टी व काही ठिकाणी पुराचा धोका निर्माण झाला असून त्यामुळे खरीप हंगामातील शेती पिके धोक्यात येण्याची शक्यता आहे. तर काही महसूल मंडळांमध्ये २४ तासांमध्ये अतिवृष्टीच्या निकषांप्रमाणे किंवा त्यापेक्षा अधिक पाऊस पडला असून, राज्य शासनाच्या महसूल विभागाने यापूर्वीच काढलेल्या आदेशाला अनुसरून महसूल व कृषी विभागाने पावसाचा जोर कमी होताच शेती पिकांच्या तसेच घरांच्या पडझडीच्या आदी नुकसानीचे तातडीने वस्तुनिष्ठ पंचनामे करावेत व शेती पिकांच्या ३३% च्या मर्यादेपेक्षा जास्त नुकसानीचे अहवाल राज्य शासनाकडे मदतीच्या मागणीसह तातडीने पाठवावेत असे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला दिले आहेत.

बीड जिल्ह्यातील बहुतांश शेतकऱ्यांनी खरीप हंगामात एक रुपयात पिक विमा योजनेत सहभाग घेतला असून आपल्या शेती पिकांच्या झालेल्या नुकसानीची माहिती विमा कंपनीच्या नियमानुसार विमा कंपनीला देखील निर्धारित वेळेत कळवावी, जेणेकरून बाधित शेतकऱ्यांना पीक विम्याचे ही संरक्षण लागू राहील, असेही आवाहन पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी केले आहे. दरम्यान सध्या जिल्ह्यात सर्वदूर सुरू असलेल्या पावसामुळे जिल्ह्यातील जवळपास सर्वच लहान मोठे जलाशय पूर्ण क्षमतेने भरले असून त्याउपर नद्यांमधून व नाल्यांमधून पाणी वाहत आहे. पावसाचा जोर आणखी पुढील २४ तास जर इतकाच प्रखर राहिला तर काही नद्या धोक्याची पातळी ओलांडू शकतात व त्यामुळे नदीकाठच्या गावांना किंवा नदीकाठच्या शहर वस्त्यांना देखील पुराचा धोका निर्माण होऊ शकतो. त्यामुळे विशेष करून जलाशय व नदीकाठच्या गावच्या नागरिकांनी सतर्क रहावे या आवाहनासह नदीच्या पूर नियंत्रण रेषेच्या क्षेत्रात राहणाऱ्या नागरिकांचे इतरत्र स्थलांतर करण्यात यावे अशा पद्धतीच्या सूचना देखील धनंजय मुंडे यांनी जिल्हा प्रशासनाला केल्या आहेत.

## ज्ञानदीप विद्यालयातील विद्यार्थ्यांनी घेतला सहलीचा आनंद

धारूर । प्रतिनिधी

ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील स्काऊट व गाईड पथकाने घेतला निसर्ग सहलचा परीसरातील ठिकाणाचा आनंद घेतला व वनभोजनाचाही आनंद घेतला. धारूर तालुक्यातील ज्ञानदीप प्राथमिक विद्यालयातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक गुणवत्तेबरोबर आपल्या परिसराची ओळख व्हावी या हेतूने तसेच आज आनंददायी शनिवार या उपक्रमा अंतर्गत किल्ले धारूर तालुक्यातील आंबा चोंडी माता मंदिर, श्रीराम जलाशय धबधबा, डोंगर दऱ्या या ठिकाणी भेट देत निसर्ग



सहलीचा आनंद घेत वनभोजन केले यावेळी विद्यार्थ्यांनी सर्व परिसरातील नैसर्गिक वनस्पती तेथील प्राणी, डोंगर, दऱ्या यांची माहिती घेत आनंद घेतला यावेळी स्काऊट गाईड प्रशिक्षक . मुंजाराम निरडे यांनी विद्यार्थ्यांना निसर्गातील वनस्पती प्राणी पक्षी याविषयी माहिती दिली . तसेच विद्यालयातील शिक्षिका कुटे तसेच राजू भैय्या शेख हे उपस्थित होते

## परळी येथील नवीन औष्णिक विद्युत केंद्र संच मान्यता कार्यान्वित करावी

### राजेभाऊ फड यांचे ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना निवेदन

परळी । प्रतिनिधी

कोळसा, पाणी नसल्याचे कारण देत औष्णिक विद्युत प्रकल्प उभारणीला दाखवली मुख्य अभियंत्यांनी असमर्थता दाखवली आहे. आता त्या विरोधात ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना राजेभाऊ फड यांनी एक निवेदन दिले आहे. येथील औष्णिक विद्युत केंद्र हे जिल्ह्यातील मुख्य रोजगार निर्मिती पैकी एक साधन आहे.आधीच बेरोजगारीचा प्रश्न भेडसावत असताना बीड मधील परळी औष्णिक विद्युत केंद्राचे मुख्य अभियंता यांच्या एका पत्रामुळे रोजगार निर्मितीला खीळ बसणार असल्याचे दिसून येत आहे. १६ नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बीडच्या परळीत ६६० मेगावॅट वीज निर्मिती प्रकल्प प्रस्तावित होता.



मात्र या प्रकल्पाला महा निर्मितीनेच असमर्थता दर्शविली आहे. औष्णिक विद्युत केंद्र परळी येथे पाणी, कोळसा इत्यादींची सद्यस्थितीत उपलब्धता नाही तसेच परळी औष्णिक विद्युत केंद्र कोळसा स्त्रोतापासून दूर असल्याने कोळसा वहनासाठी खर्च जास्त असल्याने तसेच ऊर्जा मंत्रालय भारत सरकार यांच्या १३.११.२००९ च्या कार्यालयीन निवेदनानुसार पुढील औष्णिक विद्युत केंद्राच्या क्षमता वाढ सुपर क्रिटिकल संचाद्वारे असावी असे आदेशित आहे. परळी येथील संचातून निर्माण होणारा विजेचा संभावित अस्थिर आकार जास्त असेल एमओडी प्रणालीनुसार जास्त अस्थिर आकार असलेल्या संचातून नियमितपणे वीज निर्मिती होण्याबद्दल साशंकता आहे.

> ऊर्जामंत्री देवेंद्र फडणवीस यांना राजेभाऊ फड यांनी लिहिलेल्या निवेदनाच्या प्रतिलिपीत राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष शरद पवार व राष्ट्रीय समाज पक्षाचे अध्यक्ष महादेव जानकर यांचा उल्लेख केल्याने अनेकांच्या भुवया उंचावल्या आहेत.

वरील सर्व कारणामुळे सद्यस्थितीत औष्णिक विद्युत केंद्र परळी येथे नवीन संच उभारणे महानिर्मितीच्या विचाराधीन नाही.असे पत्र अधीक्षक अभियंता (संचलन) महावितरण प्रादेशिक कार्यालय छत्रपती संभाजी नगर यांना परळी औष्णिक वीज निर्मिती केंद्राचे मुख्य अभियंता यांनी दिले आहे. ही सर्व माहिती वस्तुस्थितीला धरून नसून सध्या जे नवीन प्रकल्पाचे काम सुरू आहे त्यात एअर कुलिंग सिस्टीम तंत्रज्ञान वापरले जाते ज्यामुळे पाणी कमी लागते. जुने बंद झालेले संच क्र. १ ते ५ हे भंगारमध्ये गेल्याने त्यापोटी सरकारला ३०० ते ४०० कोटी रुपयांची कमाई झाली तसेच त्याच रिकाम्या जागेत नवीन संच उभारता येऊ शकेल. यासोबतच हा नवीन प्रकल्प चंद्रपूर किंवा कोराडीला हलवल्यास तिथे राखेसाठी नवीन जागा खरेदी करावी लागेल ज्यात करोडो रुपये खर्च होतील. हीच जागा परळी वैजनाथ येथे आधीच उपलब्ध आहे. तसेच या राखेच्या विक्रीतून पुन्हा थर्मलला करोडो रुपयांची कमाई होऊ शकते असे राजेभाऊ फड यांनी देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या सविस्तर निवेदनात नमूद केले आहे.

## एमएसईबीचा गलथान कारभार

### ३३/११ के व्ही उपकेंद्र येथे एकही शासकीय कर्मचारी नाही

नांदुरघाट प्रतिनिधी

नांदूर घाट येथे ३३/११ के. व्ही. उपकेंद्र असून तेथे त्या उपकेंद्रामार्फत दहा ते बारा गावांना लाईट पुरवली जाते गेल्या २० ऑगस्ट पासून उपकेंद्रावर एकही कर्मचारी नसून उपकेंद्रामार्फत येणाऱ्या ग्राहकांना खूप त्रास होत आहे किरकोळ लाईट फॉल्ट किंवा ट्रांसफार्मर जळाले असून त्याची देखभाल करायला कोणीही उपस्थित नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांचे देखील मोबाईल बंद आहेत ग्राहकांनी नेमके करायचे काय लाईट दुरुस्ती जर ग्राहकांनी स्वतः करण्याचा प्रयत्न केला तर जीवित हानी होऊ शकते त्यामुळे अधिकारी नसल्यामुळे ग्राहक त्रस्त



झाले आहेत. तात्काळ वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दखल घेऊन तात्काळ उपकेंद्राला लाईनमन देण्यात यावी ही मागणी गावकरी व ग्राहकांनी केली आहे.

## नुकसान झाल्याचे पंचनामे करून तातडीने मदत करा-जयदत्त क्षीरसागर

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टीमुळे शेतकरी व सर्वसामान्यांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तात्काळ दखल घेऊन पंचनामे करून तातडीने मदत करावी, असे माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनाकडे मागणी केली आहे.

जिल्ह्यात सलग तीन दिवसांपासून सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झाले आहे . अतिवृष्टीत बीड मतदारसंघात पाली,अतिवृष्टी झालेले महसूल मंडळ खालील प्रमाणे तालुका बीड मंडळ बीड ११९.५ एम.एम, पाली १०३.८ एम.एम,म.जवळा १३०.३एम.एम, नाळवंडी १०८.० एम.एम,राजुरी ८०.८ एम.एम,पिंपळनेर ११२.३ एम.एम , पेंडगाव ११६.८ एम.एम,मांजरसुंबा ७०.० एम.एम,चौसाळा ७५.८ एम.एम, नेकनूर ७२.८ एम.एम. लिंबागणेश ६६.५ एम.एम, येळमघाट ६९.८ एम.एम, च-हाटा ८०.८ एम.एम,पारगाव शिरस ८०.८ एम.एम,कुर्ला १३०.३ एम.एम तसेच बिंदुसरा धरण, खटकाळी धरण, पूर्ण क्षमतेन भरले असून धरण सांडव्याच्या वरून पाण्याचा विसर्ग सुरू असून प्रकल्पातून नदीपात्रात जवळपास ४०० क्युसेस पाणी नदीपात्रात येत आहे. नदीपात्रातील व नदीकाठावरील सर्व नागरिकांनी काळजी घ्यावी असे आवाहनमाजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले आहे. त्याचबरोबर सलग तीन दिवस पाऊस पडत असल्यामुळे बीड मतदारसंघासह बीड जिल्ह्यात शेतकर्याच्या शेतात उभे पिक वाहून गेले आहे. त्याचबरोबर शेतीही या पावसाच्या प्रवाहाने वाहून गेल्याचे दिसून येत आहे. त्याचबरोबर शहरातील विविध भागात घरांची पडझड, नाली, रस्ते, घरावरील पत्रे , झोपड्या, कोप्या, मातीच्या भिंती पडल्या आहेत. सदरील या ठिकाणी जिल्हा प्रशासनाने तातडीने पंचनामे करून तात्काळ मदत करावी अशी मागणी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी जिल्हा प्रशासनासह शासनाकडे केली आहे.

## शेतकऱ्यांच्या पोळा, गणपती व महालक्ष्मी सणावर अतिवृष्टीचे संकट

### अतिवृष्टीग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी-बोराडे

मंठा । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या पोळा, गणपती व महालक्ष्मी सणावर अतिवृष्टीची कुऱ्हाड कोसळली असून शेतीपिकांसह अनेक घरांचेही मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. या अतिवृष्टीने अनेकांचे संसार उघड्यावर पडले असून मंठा, परतूर, नेर - सेवली विधानसभा मतदारसंघ अतिवृष्टीग्रस्त घोषित करून शेतकऱ्यांना सरसकट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख तथा बाजार समितीचे सभापती ए जे बोराडे यांनी केली आहे. आज सोमवार ता.२ रोजी मंठा तालुक्यातील हेलसवाडी, लिंबे वडगाव, पेवा यासह अनेक गावातील शेत शिवारातील नुकसान झालेल्या पिकांची तसेच पडझड झालेल्या घरांची पाहणी केली.

यावेळी त्यांच्यासोबत बाजार समितीचे संचालक कल्याणराव खरात, बाबाराव राठोड, डॉ. दत्तात्रय काकडे, तुळशीराम कोहिरे, दासोपंत खरात यांच्यासह शेतकऱ्यांची उपस्थिती होती. हेलसवाडी येथे गाई व शेळ्या वाहून तर काही दगावल्याची माहिती ग्रामस्थांनी दिली. अनेक घरांमध्ये पाणी शिरून मोठ्या प्रमाणावर नुकसान झाल्याचे दिसून आले. हेलसवाडी येथील ट्रांसफार्मर पडल्यामुळे विज पुरवठा खंडित झाला होता. याबाबत श्री बोराडे यांनी विद्युत वितरण कंपनीचे कार्यकारी अभियंता श्री मठपती यांना संपर्क साधून युद्धपातळीवर काम करून वीजपुरवठा सुरळीत करावा अशा सूचना दिल्या. नदी काठावरील गावांना नुकसानीचा सर्वाधिक फटका बसला. शेतकऱ्यांचा



सर्वात मोठा सण समजला जाणारा पोळा, गणपती व महालक्ष्मी सणाच्या तोंडावर ही नैसर्गिक आपत्ती ओढवली असल्यामुळे झालेल्या नुकसानी बाबत जिल्हाधिकारी, उपजिल्हाधिकारी, तहसीलदार यांना सूचना देऊन दोन्ही तालुक्यातील नुकसानीचे पंचनामे करण्यात वेळ न घालता शेतकऱ्यांना सरसकट आर्थिक मदत मिळवून द्यावी अशी मागणी केली.तसेच शिवसेनेचे एक शिष्टमंडळ लवकरच जिल्हाधिकार्यांना भेटून मंठा व परतुर तालुकासह नेर सेवली मतदारसंघ अतिवृष्टी म्हणून जाहीर करावा अशी मागणी करणार असल्याचे सांगितले. यावेळी अशोक खरात, राजेभाऊ खरात, सुरेश शेरे, इंद्रजीत खरात, नारायण गोरे, अशोक खारवणे, काशिनाथ खरात, तुकाराम बोंडारे, लालमिया पटेल, बळीराम वरणकर, रावसाहेब थोरात, जनार्दन वरणकर, भारत शिंदे, मुरलीधर थोरात, साहेबराव थोरात, उद्धव सोनुनकर, भारत सोनटक्के, जनार्दन सोनटक्के, कैलास थोरात, कान्होबा थोरात, ग्यानुजी शिरामे, रामदास पुणेकर, बंडू सोनुनकर, दीपक डांगे, कृष्णा वरणकर यांची उपस्थिती होती.

# संततधार पावसाने ओलांडली जिल्ह्याची सरासरी

## २०२३ मध्ये याच तारखेस होता केवळ ४७ टक्के पाऊस

बीड । प्रतिनिधी

या वर्षाच्या जून ते ऑगस्ट महिन्या दरम्यान पावसाळी सरासरीने जिल्ह्याची ६५५.५ इतकी सरासरी गाठली असून वार्षिक सरासरीच्या ११५ टक्के पावसाची नोंद पहिल्या तीन महिन्यात झाली आहे गतवर्षी हाच पाऊस या दिनांकास केवळ ४७.७ टक्के इतका होता.

यंदाच्या हंगामात पाऊस चांगला राहील असा अंदाज हवामान खात्याने वर्तविला होता त्यानुसार जिल्ह्यात सर्वच तालुक्यांमध्ये सरासरी ओलांडली गेली आहे व मुबलक प्रमाणात पावसाची नोंद सर्व ठिकाणी झाली आहे. जिल्ह्यात जून ते सप्टेंबर ची वार्षिक सरासरी ५६६.१ मिमी. इतकी असताना यंदा १जून २०२४ पासून आतापर्यंत ६५५. ५ मिलिमीटर सरासरी पावसाची नोंद झाली आहे.

तालुका निहाय झालेल्या पावसाची टक्केवारी खालील प्रमाणे आहे बीड जिल्हा एकूण सरासरी ५६६.१ मिलिमीटर प्रत्यक्ष झालेला पाऊस ६५५.५ मिलिमीटर. बीड तालुक्यात जून ते सप्टेंबर सरासरी ५९४.५ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६६४.२ मिलिमीटर टक्केवारी १११.९, पाटोदा तालुक्यात ५३८.७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ७४७.९ टक्केवारी १३८.८,आष्टी तालुक्यात ५४६.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६०१.७ टक्केवारी ११०.२,आष्टी तालुक्यात ५४६.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६०१.७ टक्केवारी ११०२,गेवराई तालुक्यात ५८७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६६०.८ टक्केवारी ११२.६,माजलगाव तालुक्यात ६१६.९ प्रत्यक्ष झालेला पाऊस ६०८० टक्केवारी ११०.२,अंबाजोगाई तालुक्यात ६३२.४ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६९८ टक्केवारी ११०.४,केज तालुक्यात ५८३.६ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६१२ टक्केवारी १०४.९,परळी वैजनाथ तालुक्यात ६२८.१ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६५७.९ टक्केवारी १०४.७,धारूर तालुक्यात ६६९.८ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६८५.४ टक्केवारी १०२.३,वडवणी तालुक्यात ६०.७ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६२७.३ टक्केवारी १०४.४,शिरूर का.तालुक्यात ५१५.६ प्रत्यक्षात झालेला पाऊस ६३२.६ टक्केवारी १२२.७

आज सकाळी प्राप्त नोंदीनुसार गेल्या २४ तासात बीड जिल्ह्यामध्ये एकूण ६१ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. १०० मिलिमीटर च्या वर एकूण ३५ महसूल मंडळामध्ये अतिवृष्टीची नोंद झालेली आहे.

सर्वात जास्त अतिवृष्टीची नोंद झालेले महसूल मंडळ,गेवराई तालुक्यातील रेवकी महसूल मंडळ १७१.५,माजलगाव तालुक्यातील,गंगामसला महसूल मंडळ १७१.०,परळी तालुक्यातील,सिरसाळा महसूल मंडळ १५५.३ ,धारुर तालुक्यातील,अंजनडोह महसूल मंडळ १०८.८ ,पैठण येथील जायकवाडी धरण ८७ टक्क्याहून अधिक भरल्यानंतर यातून ताशी ५०० क्यूसेस विसर्ग उजव्या कालव्यातून माजलगाव धरणासाठी सुरू करण्यात आलेला आहे. सदर पाणी जिल्ह्यात दाखल झाल्याचे शहागड येथील पुलावरून स्पष्ट निदर्शनास येत आहे.



बीड जिल्ह्यातील बिंदुसरा प्रकल्प देखील पूर्ण क्षमतेने भरला असून बीड शहरालगत बिंदुसरा नदी मधून दुथडी पाणी वाहताना दिसत आहे. पाण्याची आवक सुरू असल्याने नदीकाठच्या नागरिकांनी सतर्कता बाळगावी अशा सूचना जिल्हा प्रशासनाच्या वतीने करण्यात आल्या आहेत.अनेक ठिकाणी झालेल्या अतिवृष्टीच्या पार्श्वभूमीवर पाऊस थांबताच शेतीचे पंचनामे करण्याचे निर्देश जिल्ह्याचे पालकमंत्री तथा राज्याचे कृषिमंत्री धनंजय मुंडे यांनी रविवारी जारी केले आहेत.

## नवनाथ शेकडे यांचे निधन

म्हसोबावाडी । प्रतिनिधी



आष्टी तालुक्यातील म्हसोबावाडी येथील नवनाथ शेकडे हे भाजपाचे सोशल मीडिया आष्टी तालुका अध्यक्ष होते त्यांची तब्येत बिघडल्याकारणाने त्यांच्यावर अहिल्यानगर येथे साई एशियन या हॉस्पिटलमध्ये उपचार सुरू होते रात्री अचानक त्यांची प्रकृती ढासळल्याने उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला त्यांच्या पाश्चात्य वडिल म्हातारदेव व आई बबई शेकडे असा परिवार आहे हे नवनाथ शेकडे हे एकुलते एक होते या घटनेने म्हसोबावाडी व पंचक्रोशीतुन हळहळ व्यक्त होत आहे.



**परळी शहराला पाणी पुरवठा करणारे वाण धरण तुडुंब भरले आहे. मागील दोन दिवसांत प्रकल्पाच्या पाणीधारण क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर पाऊस झाल्याने प्रकल्पाच्या सांडव्या वरून पाणी ओसंडून वाहत असल्याने वाण नदीतून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत आहे.**

## विद्यार्थ्यांच्या गणवेशासाठी कास्ट्राईबचे बेमुदत धरणे आंदोलन!

**माजलगाव । प्रतिनिधी**

दरवर्षी शैक्षणिक सत्र सुरू होताना किंवा स्वातंत्र्य दिनाच्या पूर्वी जिल्हा परिषद शाळेतील मुला-मुलींना गणवेश व बूट सॉक्स वितरण केले जाते परंतु यावर्षी ते अद्याप पावतो वितरित करण्यात आले नाहीत.तेव्हा ते ०५ सप्टेंबर शिक्षक दिनापूर्वी तालुक्यातील सर्व जिल्हा परिषद शाळेतील विद्यार्थ्यांना ते मिळावेत अन्यथा आपल्या कार्यालयासमोर बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येतील या आशयाचे निवेदन मा.गटशिक्षणाधिकारी यांना कास्ट्राइब महासंघाच्या वतीने देण्यात आल्याचे महासंघाचे ता.अध्यक्ष राहुल टाकणखार यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे कळविले आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की गावस्तरावर स्थापन झालेल्या इंग्लिश स्कूल शाळांमध्ये मात्र विद्यार्थ्यांना या सुविधा त्या प्रशासनातील लोकांनी उपलब्ध करून दिलेल्या आहेत.त्यामुळे जिल्हा परिषद शाळांमध्ये जे गोरगरीब-वंचितांचे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत,त्यांच्यामध्ये यामुळे न्यूनगंडाची भावना होताना दिसून येत आहे. व यामुळे पालक वर्गामध्ये देखील जिल्हा परिषद शाळेकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलत चालला आहे. विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा मिळत नसल्याने त्यांच्यात नाराजीचा सूर उमटत असून,त्याचा परिणाम शाळेतील पटसंख्येवर पडत असल्याचे दिसून येत आहे. या सर्व बाबीचा गांभीर्याने विचार करून प्रशासनाने दि.०५ सप्टेंबर २०२४ पूर्वी विद्यार्थ्यांना या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अन्यथा महासंघाच्या वतीने गट शिक्षणाधिकारी कार्यालयासमोर दररोज शासकीय सुट्ट्या वगळता सायंकाळी पाच ते सहा या दरम्यान बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याचा इशारा महासंघाचे जिल्हा मुख्य संघटक भारत टाकणखार सचिव अभिमन्यू इबिते जिल्हा उपाध्यक्ष वसंत टाकणखार राजकुमार सोनवणे कृष्णा हौसरमल किरण शिंदे निलेश गावडे नारायण भाळशंकर जीवन डोंगरे शिवाजी भाळशंकर किरण माने हनुमंत पांढरपोटे नागनाथ पडलवार प्रवीण जाधव राजेंद्र सातपुते राहुल खुणे नितीन पुटवाड बळीराम घनघाव गोविंद पवार अमोल राऊत अविनाश येळंबकर सय्यद आयुब शिवाजी व्यवहारे शंकर पवार सुमित घाडगे व शिक्षण विभाग प्रमुख रवी आदमाने विजय वैरागे आदींनी दिला आहे.



## पोळा सण उत्साहात साजरा

**दिंद्रुड । प्रतिनिधी**

या वर्षी सुरवाती पासुनच चागला पाऊस पडला आहे त्यामुळे शेतकऱ्यांनी पोळा सण उत्सवात साजरा करण्यात आला आहे. शेतकरी हा आपल्या सर्जा राज्य बैलाला वर्ष भर अतिशय जिवापाड जपत असतो शेतात शेतीतील सर्व कामे नांगरणी, वखरणी,कोळपणी, आदी कामे बैला ने करतो, या बैलासाठी, वर्षातील एक सण म्हणजे पोळा या सणाला शेतकरी आपल्या बैलांना धुऊन, त्याचा शिंगणा रंग देतो गावात हनुमान मंदिरात घेऊन जाण्यासाठी बैलाला जुल, भासिंग, फुगे, आदी सजावट करून हनुमान मंदिराला प्रदक्षिणा घातली जाते, या सर्व शेतकऱ्यांनी पोळा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

## आष्टी तालुक्यातील १०० च्या वर ग्रामपंचायतीकडे नाही धुर फवारणी मशीन

### गावात फवारणी करायची कशी? मशिन खरेदीची जबाबदारी कोणाची!

**म्हसोबावाडी । प्रतिनिधी**

गावोगाव साथीच्या आजाराला प्रतिबंध व्हावा साथीचे आजार उद्भवू नयेत यासाठी ग्रामपंचायतीकडे धुळ फवारणी मशीन असणे बंधनकारक असून वेळोवेळी त्या माध्यमातून गावात व घरोघरी धुर फवारणी करायची असते. पण आष्टी तालुक्यातील बोटावर मोजता येतील एवढ्या ग्रामपंचायतीकडे हे मशीन उपलब्ध असुन १०० च्या वर ग्रामपंचायतीकडे धुर फवारणी मशीन नसल्याने फवारणी करायची कशी असा प्रश्न उपस्थित केला जात आहे.

प्रत्येक ग्रामपंचायतीकडे स्थानिक विकास निधीच्या खर्चातुन आरोग्याचा प्रश्न उद्भवू नये यासाठी स्व खर्चातुन धुर फवारणी मशीन उपलब्ध असणे बंधनकारक असून त्या साठी आरोग्य विभागाकडुन औषध दिले जाते. व गावात साथीच्या आजाराला प्रतिबंध घातला जावा, साथीचे आजार पसरू नये यासाठी धुर फवारणी केली जाते. यांची जबाबदारी ग्रामपंचायतीकडे असते. पण आष्टी तालुक्यातील कडा, धामणगाव, मुर्शदपूर, धानोरा, दौलावडगाव, यासह १५ ते २० ग्रामपंचायतीकडे धुर फवारणी मशीन उपलब्ध आहे. पण धक्कादायक बाब म्हणजे तालुक्यातील १२५ ग्रामपंचायत पैकी २० ते २५ ग्रामपंचायतीकडेच मशीन असून १०० हुन अधिक ग्रामपंचायतीला हे मशिनच उपलब्ध नसल्याने फवारणी करायची कुठुन असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. ग्रामपंचायतीला आलेल्या विविध निधीतुन स्वंतत्र तरतुद असताना याकडे कानाडोळा झाल्याचे दिसुन येत आहे. वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून यांची चौकशी होऊन मशीन खरेदी करण्याचे आदेश द्यावेत अशी मागणी शिवक्रांती सेनेचे युवक प्रदेश अध्यक्ष दिपक सोनवणे यांनी केली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्रातील जवळच्या गावात कोणताच अधिकारी व कर्मचारी येत नसल्याने व सारखी पावसाची रिमझिम

त्यामुळे आष्टी तालुक्यात सर्वाधिक थंडी ताप खोकला याचे रुग्ण आढळून येतात याकडे मात्र प्राथमिक आरोग्य केंद्रातील कर्मचारी व अधिकारी यांचा निष्काळजीपणा दिसून येत आहे हे प्राथमिक आरोग्य केंद्र असून अडचण नसून खोळंबा अश्या प्रकारे झाले आहेत याकडे ना कोणत्या वरिष्ठ अधिकारी चे लक्ष दिसून येत आहे प्रत्येक गावात शंभराच्या वर प्रत्येक गावात रुग्ण अजून येतात तरी प्रत्यक्षात आरोग्य केंद्र गावातील कर्मचारी गावातील कोणते व्यस्त आहेत याची सखोल चौकशी करून वरिष्ठांना अहवाल पाठवावी अशी मागणी होतं आहे.

## बळीराम इप्पर यांच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध कार्यक्रम

अंबाजोगाई । प्रतिनिधी



बळीराम पांडूरंग इप्पर यांचा ७५ वा अमृत महोत्सव ०८ सप्टेंबर रविवार रोजी शहराच्या नागझरी परिसरातील संत भगवान बाबा मंदीर परिसरात होणार असून या निमित्याने दुपारी एक ते तीन या वेळात झी टॉकीज फेम ह.भ.प. प्रकाश महाराज साठे यांचे सुश्राव्य किर्तन होणार असून यावेळी मा.राज्यमंत्री पंडीतराव दौंड, अंबाजोगाईचे उपनगराध्यक्ष दिलीप सांगळे,परळीचे माजी सभापती भास्कर चाटे, भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, महाराष्ट्र राज्याच्या ग्रामविकास खात्याचे कक्ष अधिकारी अच्युत इप्पर,परभणीच्या गुन्हे शाखेचे डीवायएसपी अशोक इप्पर, नाथ शिक्षण संस्थेचे सहसचिव प्रदिप खाडे, नागझरीचे उपसरपंच उद्धव इप्पर, शेपवाडीचे उपसरपंच पाटलोबा शेप,शेपवाडीचे सरपंच शिवप्रसाद शेप, सामाजिक कार्यकर्ते दिलीप गित्ते,माजी सरपंच विष्णूपंत शेप आदी प्रमुख मान्यवर उपस्थित राहणार आहेत. तरी बळीराम इप्पर यांच्या अमृत महोत्सव सोहळ्या निमित्तच्या भरगच्च कार्यक्रमास उपस्थित राहण्याचे आवाहन पद्मावती ज्वेलर्सचे सुनिल पवार,मंत्री धनंजय मुंडे यांचे स्वीय सहाय्यक केशव नागरगोजे,हाडोळी बेल गावच्या सरपंच महानंदा चाटे,नाथराव इप्पर, रामदास शेप,विरकृष्ण अर्बन निधीचे अध्यक्ष बालासाहेब शेप,ऍड.बालाजी इप्पर, गोविंद इप्पर,महिला आयोग सदस्या सविता मुंडे,समस्त इप्पर परिवार व मित्र परिवार आदींनी केले आहे.

## युसूफवडगांव येथे बैलपोळा सण उत्साहात साजरा

**युसूफवडगांव । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील युसूफवडगांव येथील शेतकऱ्यानी अतिशय उत्साहात आपल्या सर्जा राजाला सजवुन गाजतवाजत मिरवत बैलपोळा सण उत्साहात साजरा केला.पण गेल्या काही वर्षापासुन शेतकऱ्यांनाकडे पशुधनात लक्षणीय कमतरता दिसुन आली.

शेतकऱ्यांच्या खांद्याला खांदा लावुन बैल काळ्या आईची सेवा मशागत करतो त्यांच्या प्रत्येक सुख दुःखात सदैव सोबत असतो अशा बैलांचा सण म्हणजेच बैलपोळा आदल्या शेतकरी ज्या खांद्यावर जोत ठेवुन काळ्या आईची मशागत करतो त्या खांद्यांवर तुप हळद लावुन खांदा मळणी करतो तर दुसऱ्या दिवशी म्हणजेच बैलपोळ्या



दिवशी त्याला अंघोळ घालुन आकर्षक झुल चढवुन शिंगाणा रंगवुन त्याच्या वाजतगाजत मिरवणुक काढुन त्यांची विधिवत पुजा करून त्याला पुरणपोळीचा नैवेद्य खाऊ घेऊन त्याच्या बद्दल कृतज्ञता व्यक्त करूनच मग तो आपला उपवास सोडतो.या वर्षी वरूणराजाने भरभरून आशीर्वाद दिल्याने शेतकरी वर्गात आनंदाचे वातावरण होते.त्यामुळे बैलपोळा सण उत्साहात साजरा होणार यात तिळ मात्र शंका नव्हती.त्यामुळे शेतकऱ्यांनी वाजतगाजत आपल्या बैलांची मिरवणुक काढत बैलपोळा सण उत्साहात साजरा केलला असला तरी या सणाच्या निमित्ताने एक गोष्ट प्रखरश्याने जाणवली ती शेतकऱ्याकडील पशुधनाची कमतरता कधी दुष्काळ,तरी कधी लंम्पी सारखा रोग तर कुठे चारा पाण्याची कमतरता यामुळे बोटावर मोजता येईल ऐवढ्याच आणि हौशी शेतकऱ्यांनाकडे सध्या बैलजोड्या आहेत.आणि अशा हौशी शेतकऱ्यांना मुळेच बैलपोळ्या सारखा काळ्या मातीशी घट्ट नात असलेला सण टिकुन आहे.

## अध्यक्षपदी डॉ. दामोदर थोरात तर सचिवपदी जगदीश जाजू

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ अंतर्गत दक्षिण मराठवाडा प्रादेशिक विभाग (फेसकॉम)च्या नुकत्याच





झालेल्या त्रैवार्षिक निवडणुकीचा निकाल जाहीर झाला असून अध्यक्ष म्हणून डॉ. दामोदर थोरात (अंबाजोगाई ), उपाध्यक्षपदी ॲड. रमेश व्हटे (धाराशिव) तर सचिवपदी जगदीश जाजू (अंबाजोगाई) यांची निवड करण्यात आली आहे.

महाराष्ट्र जेष्ठ नागरिक महासंघ (फेसकॉम) ही जेष्ठांसाठी कार्य करणारी नोंदणीकृत सामाजिक संघटना असून महाराष्ट्रात या संघटनेचे एकूण १४ प्रादेशिक विभाग असून नोंदणीकृत २०९२ जेष्ठ नागरिक संघ कार्यरत आहेत. पैकी मराठवाड्यात दक्षिण मराठवाडा व उत्तर मराठवाडा प्रादेशिक विभाग असे दोन विभाग आहेत. यात दक्षिण मराठावाडा प्रादेशिक विभागात बीड, धाराशिव, लातूर व परभणी हे चार जिल्हे असून या जिल्ह्यात ४५५ जेष्ठ नागरिक संघ नोंदणीकृत व कार्यरत आहेत. नविन कार्यकारिणीतील इतर सदस्य पूढील प्रमाणे - सहसचिव- हरिशन्द्र राठोड(सत्तरधरवाडी, ता.औसा ), कोषाध्यक्ष-कांतराव गाजरे (माजलगाव) तर कार्यकारिणी सदस्य म्हणून रमेश कुलकर्णी (लातूर)अमृत टेकाळे (वाटवडा), अप्पाराव जाधव (राणीसावरगाव), सौ. विजया कातकडे (परभणी)यांची बिनविरोध निवड झाली असून त्यांचा कालावधी तीन वर्षाचा आहे. यात निवडणूक अधिकारी म्हणून दे.भ.पाठक(लातूर) यांनी काम पहिले.



**पिंपळवंडी : बळीराजा व लाडक्या सर्जा राजाचे अतूट नाते वर्षभर शेतात खांद्यावर ओझे घेऊन राबणारा सर्जा राजाचा ‘‘पोळ्याचा ‘‘महत्त्वाचा सण.कृतज्ञता म्हणून पोळ्याला सुवासिनी ओवाळून पूजा करतात व सर्जा राजाला पुरणपोळी चारून बळीराजा आनंदाने सण साजरा करतो.पाटोदा तालुक्यातील पिंपळवंडी येथेही पोळ्याचा सण पाऊस पाणी भरपूर असल्याने शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात साजरा करून सर्जा राजाचे जल्लोषात स्वागत केले.**

## शि.भ.प.रामभाऊ खरबड यांची शिव कीर्तन सेवा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

**पवित्र तीर्थक्षेत्र संत शिरोमणी मन्मथ स्वामी संजीवन समाधी कपिलधार येथे काल दिनांक १ / ९ /२०२४ रविवारी मासिक शिवरात्री निमित्त शिव कीर्तन सेवा संपन्न झाली. या कीर्तन सेवेसाठी महाराजांनी निरूपणासाठी पुढील अभंग घेतला होता**



।। मन्मथ स्वामी महाराज. ।।
।। भक्ता दावी निजबीज ।।

या संत.लक्ष्मण महाराज आष्टी यांच्या अभंगावर शि.भ.प. राजाभाऊ खरबड रामवडगाव यांनी सेवेसाठी अभंग घेतला होता आपल्या या अभंगावर महाराजांनी विवेचन करताना संत शिरोमणी महाराज यांच्या कार्यावर व भक्तीवर प्रकाश टाकला. अतिशय रसाळ वाणी मधून संत शिरोमणी मन्मथ स्वामी महाराज यांचे चरित्र सांगितले. या कीर्तन सेवेला धनेगाव भं.म अंबाजोगाई महीला भजनी मंडळ कोड ,भजनी मंडळ रामवडगाव,भ.मडळ कानडी, भ.मंडळ किर्तनकार विश्वनाथ स्वामी देवस्थान पुजारी, शि.भ प.सौ.सरस्वतीताई गंगाधर स्वामी अंबाजोगाई,शि.भ.प. राम लाखादिवे गुरूजी, शि.भ.प राजकुमार लखदिवे, शि.भ.प रमेश हीरे.व डॉ. प्रशांत स्वामी कपीलाधार, माहेश्वरमुर्ती.शंकर स्वामी महाराज जायफळकर ,वाळके आबा व गायक वादक शिवभक्त श्रोते महीला पुरूष हजारांच्या संखेत होते . तसेच श्री क्षेत्र कपिलधार येथील भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# वनराज आंदेकरांच्या 'मारक्या' बहिणींना अटक, प्रॉपर्टीसाठी दिली सख्ख्या भावाची सुपारी

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील राष्ट्रवादीचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर (तरपीरक्ष –पवशङ्करी) खून प्रकरणी मोठी बातमी समोर आली आहे. वनराज आंदेकर यांच्या दोन्ही बहिणींना पुणे पोलिसांनी (झ्रींपश झेश्रळलश) अटक केली आहे. वनराजचा खून करण्यासाठी त्याच्या बहिणींनी आणि मेहुण्यानं बनवला (झ्रींपश उीळाश छश्रुी) प्लॅन होता. संपत्तीच्या वादातून हा खून केल्याची माहिती आहे. गेल्या अनेक दिवसांपासून त्यांच्यामध्ये प्रॉपर्टीचे वाद सुरू होते. सुसंस्कृत पुण्यात नेमकं चाललंय काय? असा प्रश्न सध्या खरंच ऐरणीवर आलाय.

वनराज आंदेकर यांच्या दोन्ही बहिणींना पुणे पोलिसांनी अटक केली आहे. वनराज चा खून करण्यासाठी त्याच्याच बहिणींनी आणि मेव्हण्यानी प्लॅन बनवला होता. कौटुंबिक आणि संपत्तीच्या वादातून हा खून केल्याची माहिती आहे. गेल्या अनेक दिवसांपासून बहिणी आणि वनराजच्या वडिलांसोबत प्रॉपर्टी वरून वाद सुरू होते. काल जयंत आणि गणेश कोमकर यांनी मिळून सोमनाथ गायकवाड याला सांगून वनराजचा काटा काढायचं ठरवल. संध्याकाळी ८.३० वाजता नाना पेठेत वनराजवर गोळीबार करत कोयत्याने हल्ला केला होता.

गणेश कोमकर हा आंदेकर यांचा जावई आहे. त्याला नाना पेठेतील एक दुकान दिले होते. महापालिकेने अतिक्रमण कारवाईमध्ये हे दुकान पाडले. त्यानंतर कुटुंबामध्ये वादाला सुरुवात झाली. आंदेकर कुटुंबाच्या आशिर्वादानेच गणेश कोमकर हा गुंडगिरी करीत होता. गणेश कोमकर याने स्वत:ची गँग तयार केली होती. एका भांडणामध्ये मध्यस्थी करून भांडणे मिटवल्याच्या तसेच दुकानाचे अतिक्रमण पाडायला लावल्याचा रागातून बहिणीने वनराज यांना 'तुला पोरं बोलवून ठोकतेच' अशी धमकी दिली होती. त्यानंतर वनराज यांच्यावर हल्ला झाला. त्यातच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेमुळे पुण्याच्या गुन्हेगारी विश्वासह राजकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे गणेश कोमकर याने या अगोदर शिवसेना शहर प्रमुच रामभाऊ पारेख यांच्यावर ॲसिड हल्ला केला होता. वनराज आंदेकर याला आपल्यावर हल्ला होऊ शकतो, याची जाणीव होती. त्यामुळे तो सतत आपल्या टोळीतील मुलांच्या घोळक्यात वावरत असे. रविवारी घरगुती कार्यक्रम असल्याने त्याच्याबरोबर मुले नव्हती. घरातील कार्यक्रम संपल्यानंतर तो रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास डोके तालीम जवळील अशोक चौकातील कार्यालयाजवळ येऊन थांबला होता. त्याच्याबरोबर एक नातेवाईकही होता. त्याचवेळी ५ ते ६ दुचाकीवरुन १० ते १२ हल्लेखोर आले.





**साश्रू नयनांनी वनराज आंदेकर यांना अखेरचा निरोप**

साश्रूनयनांनी व भावपूर्ण वातावरणात राष्ट्रवादी काँग्रेसचे माजी नगरसेवक वनराज आंदेकर यांना अखेरचा निरोप देण्यात आला. सोमवार दि. २ सप्टेंबर ला सकाळी १२ वाजेपर्यंत ससून रुग्णालयात शव परीक्षण करून त्यांना नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आले. यावेळी भवानी, नाना पेठ, गंज पेठ, महात्मा फुले पेठ व शहर व ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने त्यांचे हितचिंतक, निकटवर्तीय, महिला व नागरिकांकडून हळहळ व्यक्त करण्यात आली. प्रत्येकाशी त्यांचे एक वेगळे नातेसंबंध तयार झाले होते. यावेळी प्रत्येकजन त्यांच्यासोबत चा आपला अनुभव सांगत अनेकांच्या डोळ्यात अश्रू अनावर झाले. या दुर्घटनेचे वृत्त समजतात शहरात अनेक ठिकाणी व्यापारी व नागरिकांनी स्वयंस्फुर्त पणे व्यवहार बंद ठेवत कडकडीत बंद पाळून या घटनेचा निषेध व्यक्त केला. दुपारी तीन नंतर आंदेकर यांची अंतयात्रा शव रथातून त्यांच्या निवासस्थानापासून निघाली. रस्त्याच्या दुतर्फा नेत्यांनी श्रद्धांजली अर्पण करण्याकरिता साश्रूनयनांनी त्यांना अखेरचा निरोप दिला. तसेच अंतयात्रेत मोठ्या प्रमाणात वनराज भाऊ अमर रहे अशा घोषणा दिल्या.

## वारजे ब्रिजवर दहा वाहने एकमेकांना धडकली

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातल्या वारजे ब्रिजवर सायंकाळी एक विचित्र अपघात झाला आहे. तब्बल दहा वाहने एकमेकांवर आदळल्याची माहिती आहे. मुंबई-बंगळूर रस्त्यावर हैद्राबाद बिर्याणीसमोर दहा वाहने एकमेकांवर आदळली आहेत.




वारजे येथून जाणाऱ्या मुंबई बंगळूर महामार्गावर तीव्र उतारावर हैदराबाद बिर्याणी समोर सायंकाळी ७.३० वाजता दहा चारचाकी वाहने एकापाठोपाठ आदळून विचित्र अपघात झाला आहे. या अपघातात कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र अपघातग्रस्त वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, सायंकाळी ७.३० वाजता चांदणी चौकाकडून एक टाटाच्या चारचाकी वाहनाने वेगावर नियंत्रण न मिळवता आल्याने मारुती स्विफ्टला पाठीमागून जोरदार धडक दिली आणि ते वाहने नियंत्रण करताना पाठीमागून येणारी वाहने एकमेकावर जोरदार धडकत आल्यामुळे हा विचित्र अपघात घडला आहे.

अपघातानतंर महामार्ग आणि स्थानिक वाहतूक पोलिस साधारण अर्धातास तरी घटणास्थळी नव्हते. त्यानंतर वारजे वाहतूक पोलीस घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी तातडीने अपघातग्रस्त वाहने बाजूला करत वाहतूक कोंडी सुरळीत केली आहे. वारजे आणि वडगाव यामधील नदीपूल अरुंद असल्याने वारजेपासून चांदणी चौकापर्यंत या महामार्गावर कायमच वाहतूक कोंडी होत आहे. तसेच महामार्गावर मोठ्या प्रमाणात खड्डे पडले असल्याने संथ वाहतूक होत असते. वाहने एकापाठोपाठ अगदी खेटूनच वाहतूक सुरू असल्याने या ठिकाणी अपघाताची मालिका नित्याचीच झाली आहे.

## उजनीतून भीमेच्या विसर्गात घट ; १६ हजार ६०० क्युसेक विसर्ग




**पुणे । प्रतिनिधी**

उजनी धरणातून भीमा नदीमध्ये सोडण्यात येणार्या विसर्गात सातत्याने घट करण्यात येत असून, रविवारी (दि. १) सायंकाळी ७ वाजता विसर्गात घट करून तो १६ हजार ६०० क्युसेक एवढा करण्यात आला. त्यामुळे याआधी इंदापूर तालुक्यातून वाहणार्या भीमेचे पाणी नदीपात्रा बाहेरून वाहत होते. विसर्गात घट झाल्याने रविवारी हे पाणी पात्रातून वाहतानाचे चित्र पाहावयास मिळत आहे. उजनी धरणामध्ये रविवारी सायंकाळी ७ वाजता ११९.२६ टीएमसी एवढा साठा असून, धरण १०३.७९ टक्के क्षमतेने भरलेले आहे. दौंड येथून उजनी धरणामध्ये येणार्या पाण्याचा विसर्ग आता कमी होऊन तो ९ हजार ९२२ क्युसेक एवढा सध्या आहे. दुसर्या बाजूला इंदापूर तालुक्यातून वाहत असलेल्या निरा नदीचे पाणीही आता नदीपात्रात उतरल्याचे चित्र शुक्रवारी दिसून आले. दरम्यान तुडुंब भरलेले नदीपात्र बघण्यासाठी नागरिकांनी गर्दी केली होती.

## प्रा. डॉ. शिल्पागौरी प्रसाद गणपुले यांना राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ जाहिर

**पुणे । प्रतिनिधी**

पुणे जिल्हा शिक्षण मंडळाच्या, प्रा. रामकृष्ण मोरे महाविद्यालय, पुणे येथील इंग्रजी विषयाच्या प्राध्यापिका प्रा. डॉ. शिल्पागौरी प्रसाद गणपुले यांना उच्च शिक्षण मंत्रालय, भारत सरकार यांच्यातर्फे उच्च शिक्षण आणि तंत्रनिकेतन या विभागाच्या अंतर्गत राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार २०२४ जाहीर करण्यात आला आहे.



गुणवत्ता प्रशस्तीपत्रक ५ हजार रोख आणि रौप्य पदक असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. हा पुरस्कार भारताच्या राष्ट्रपती महामहिम द्रौपदी मुर्मू यांच्या शुभहस्ते विज्ञान भवन, नवी दिल्ली येथे दि. ५ सप्टेंबर रोजी प्रदान करण्यात येणार आहे.

प्रा डॉ. शिल्पागौरी प्रसाद गणपुले ह्या गेली ३० वर्षे अध्यापन क्षेत्रात कार्यरत आहेत. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्या परिषद आणि मानव्य विद्या शाखेच्या सदस्य म्हणून काम केले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या ७५ व्या वर्धापनदिनानिमित्त १० फेब्रुवारी २०२४ रोजी त्यांना उत्कृष्ट अध्यापक पुरस्काराने गौरवण्यात आले. प्रा. डॉ. गणपुले यांनी १२ हून अधिक देशांमध्ये शोधनिबंध सादर केले आहेत. तसेच त्यांनी ७ पुस्तकांचे लेखन, १४ पुस्तकांचे संकलन व ३ पुस्तकांचे भाषांतर केले आहे. प्रो. डॉ. गणपुले यांच्या मार्गदर्शनाखाली आजपर्यंत १४ विद्यार्थ्यांनी पी. एच. डी. आणि एम. फील पूर्ण केले आहे. पुणे जिल्हा शिक्षण मंडळाचे अध्यक्ष मा. नामदार उप मुख्यमंत्री . अजित पवार, उपाध्यक्ष राजेंद्र घाडगे, मानद सचिव ॲडव्होकेट. संदीप कदम, रामानंदतीर्थ विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्राचार्य बेजमी लोबो, उप प्राचार्य . हिरालाल सोनावणे, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, आजी माजी विद्यार्थी यांनी अभिनंदन केले आहे.

## अतिक्रमण निरीक्षकांच्या दर तीन महिन्यांनी होणार बदल्या

**पुणे । प्रतिनिधी**

शहरात अतिक्रमणे वाढत असताना त्याकडे अतिक्रमण निरीक्षक व सहाय्यक अतिक्रमण निरीक्षकांचे हितसंबंध तयार होत आहेत. त्यामुळे आता हा प्रकार रोखण्यासाठी दर तीन महिन्यांनी या कर्मचाऱ्यांच्या बदल्या करण्याचे धोरण अतिक्रमण विभागाने तयार केले आहे. ते अतिरिक्त आयुक्त व आयुक्तांच्या मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे.



पुणे शहरातील मध्यवर्ती पेठांसह उपनगरांमधील प्रमुख रस्ते, गावठाणामध्ये मोठ्या प्रमाणात अतिक्रमणे झाली आहे. रस्ता, पादचारी मार्गावर मोकळी जागा दिसली की लगेच तेथे अतिक्रमण करून व्यवसाय केला जात आहे. खाद्यपदार्थांच्या स्टॉलसह अनेक प्रकारचे व्यवसाय रस्त्यावर केले जात आहेत. वाहनांसाठी पार्किंगच्या आरक्षीत जागेवरही हातगाडे, स्टॉल लावले जात असल्याने रस्ते अरुंद होऊन वाहतूक कोंडी होत आहे. त्यामुळे नागरिक त्रस्त झालेले आहेत. 'सकाळ'ने याबाबत वृत्त प्रकाशित करून हा प्रकार चव्हाट्यावर आणला.

दरम्यान, केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनी गेल्या महिन्यात महापालिकेत घेतलेल्या बैठकीमध्ये रस्ते आणि पादचारी मार्ग त्वरित अतिक्रमण मुक्त करा, नागरिकांना चालण्यासाठी जागा उपलब्ध करून द्या. राजकीय लोकांनी दबाव आणला तरी कारवाई करा असे आदेश महापालिका आयुक्तांना दिलेले होते. त्यानंतर एक आठवडा शहरात जोरदार कारवाई करण्यात आली. त्यानंतर कारवाई थंडावली आहे. ज्या ठिकाणी कारवाई केली तेथे पुन्हा आणखी पक्के अतिक्रमण करून रस्ता, पादचारी मार्ग व्यापून टाकला आहे. तरीही अतिक्रमण विभागाचे सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक, अतिक्रमण निरीक्षकांकडून कारवाई केली जात नाही. वर्षानुवर्षे एकाच क्षेत्रीय कार्यालयाच्या हद्दीमध्ये हे कर्मचारी काम करत आहेत. त्यामुळे तेथील व्यावसायिकांसोबत त्यांचे हितसंबंध निर्माण होऊन कारवाई करण्यास टाळाटाळ केले आहे. त्यामुळे प्रशासनाने सहाय्यक निरीक्षक व अतिक्रमण निरीक्षकांच्या दर तीन महिन्याला बदली करण्याचा धोरणात्मक निर्णय घेण्यात आला आहे. या निर्णयामुळे या कर्मचाऱ्यांचे क्षेत्रीय कार्यालयात बस्तान बसणार नाही, तसेच कारवाईचा धडाका लावून, त्याचा अहवाल अतिक्रमण उपायुक्तांसह अतिरिक्त आयुक्त, आयुक्तांना सादर करावा लागणार आहे. जर रस्त्यावरील अतिक्रमणे कायम राहिल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार आहे.

## कुणी बोललं म्हणून अंगाला भोकं पडत नाहीत; सुप्रियाताईंच्या टीकेवर अजित दादांचा बारामतीतून पलटवार

**पुणे । प्रतिनिधी**

राज्याचे उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रमुख नेते अजित पवार आज होमग्राऊंड म्हणजेच बारामतीमध्ये आहेत. आपल्या जनसन्मान यात्रेनिमित्त ते बारामतीमधील लाडक्या बहिणींशी संवाद साधताना अजित पवारांनी त्यांच्या बहिण आणि बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांना टोला लगावला आहे. दोन दिवसांपूर्वी सुप्रिया सुळे यांनी नाव न घएता अजित पवारांवर जोरदार हल्लाबोल केला होता. मी सकाळी लवकर उठतो, या अजित पवार यांच्या भाषणातील वाक्यावरुन त्यांनी दादांवर खोचक शब्दात टीका केली होती. आता, बारामतीमध्ये लाडक्या बहिणींशी संवाद साधता अजित पवारांनी नाव घेता सुप्रिया सुळेंना टोला लगावला. काहीजण म्हणतात दुधवाला सकाळी लवकर उठतो, पण आम्ही कुठं म्हणलो की दुधवाला दुपारी उठतो, असे म्हणत प्रत्त्युतर दिलं.

बाधकामातलं मला चांगलं कळतं, मी इंजिनिअर नसलो तरी इंजिनअरला जेवढं जमणार नाही, तेवढं मला जमतं. त्यामुळे, मी सकाळी सकाळी काही काम पाहण्यासाठी लवकर जात असतो, असे म्हणत राजकोट येथील पुतळा पाहणीसाठी मी सकाळी गेलो होतो, असे अजित पवार यांनी म्हटले. अजित पवार यांनी बारामतीमधील जनसन्मान यात्रेत बोलताना विकासकामांच्या मुद्द्यांवर भर दिला. बारामतीमधील विकासकामे आणि सरकारी योजनांचा लाभ यांसंदर्भाने भाषण करत सुप्रिया सुळेंनी केलेल्या टीकेवरही अजित पवारांनी पलटवार केला. राजकीय टीका टिपण्णी टाळून आपण केवळ विकासावरच बोलायला पाहिजे. काहीजण बोलतात त्यांना बोलू द्या, बोललं म्हणून आपल्या अंगाला भोकं पडतात का?, असे म्हणत नाव न घेता सुप्रिया सुळेंवर पलटवार केला. काहीजण म्हणतात सकाळी कोण लवकर उठा म्हणतं, पण आम्ही कुठं म्हणतो तुम्ही म्हणलाय. म्हणतात की दुधवाला सकाळी लवकर उठतो, पण कुठं म्हटलं दुधवाला दुपारी उठतो, असे म्हणत सुप्रिया सुळे यांनी केलेल्या टिकेला अजित पवारांनी प्रत्युत्तर दिलंय. तसेच, अशा टीका टिपण्णीला महत्त्व देऊ नका, असे आवाहनही अजित पवार यांनी बारामतीकर व कार्यकर्त्यांना केलं.



## पुणे जिल्ह्यात पोलिस निरीक्षकांच्या बदल्या

**पुणे । प्रतिनिधी**

जिल्हा पोलिस अधीक्षक पंकज देशमुख यांनी जिल्ह्यातील नऊ पोलिस निरीक्षकांच्या बदल्या केल्या. नव्याने आलेल्या पाच पोलिस निरीक्षकांना नेमणुका देण्यात आल्या. तर तीन सहायक पोलिस निरीक्षकांच्या विनंती बदल्या करण्यात आल्या. बारामती शहर व तालुका पोलिस ठाण्याच्या अधिकार्यांच्या मुख्यालयात बदल्या करण्यात आल्या आहेत.

महाराष्ट्र पोलीस
सद्रक्षणाय खलनिग्रहणाय

बदल्यांचे आदेश नुकतेच काढण्यात आले. प्रशासकीय कारणास्तव पोलिस निरीक्षकांच्या केलेल्या बदल्या पुढीलप्रमाणे (कोठून कुठे) – प्रभाकर माधवराव मोरे (परकीय नागरिक नोंदणी कक्ष ते खेड), दिनेश सखाराम तायडे (पोलिस उपमुख्यालय बर्हाणपूर, बारामती ते आळेफाटा), संतोष शामराव जाधव (नियंत्रण कक्ष ते जिल्हा वाहतूक शाखा), अभिजित सुभाष देशमुख (जिल्हा विशेष शाखा ते परकीय नागरिक नोंदणी कक्ष), गोरख कृष्णा गायकवाड (बारामती तालुका ते नियंत्रण कक्ष), संतोष दत्तात्रय गिरीगोसावी (जिल्हा वाहतूक शाखा ते पौड), अरुण ज्ञानदेव फुगे (मंचर ते नियंत्रण कक्ष), संतोष श्रीमंत घोळवे (बारामती शहर ते नियंत्रण कक्ष), ज्योतीराम माणिक गुंजवटे (शिरूर ते नियंत्रण कक्ष)

नव्याने हजर झालेल्या पोलिस निरीक्षकांना मिळालेल्या नेमणुका–

– श्रीकांत चंद्रकांत कंकाळ (मंचर), विलास किसन नाळे (बारामती शहर), विश्वास सुभाष जाधव (बारामती तालुका), संदेश अरुण केंजळे (शिरूर), राजेश नारायणराव रामाघरे (आर्थिक गुन्हे शाखा)

सहायक पोलिस निरीक्षकांच्या विनंती बदल्या पुढीलप्रमाणे :– राजकुमार काशिनाथ डुणगे (इंदापूर ते वालचंदनगर), सचिन नाथाराम लोखंडे (आर्थिक गुन्हे शाखा ते माळेगाव), मनोजकुमार सुभाषराव नवसरे (रांजणगाव ते सुपा)

## आंबेगाव, जुन्नर व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांवर शेती पाण्याबाबतअन्याय होऊ देणार नाही-मुख्यमंत्री एकनाथ शिंदे



**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव, जुन्नर व शिरूर तालुक्यातील शेतकऱ्यांचे हित लक्षात घेऊन हुतात्मा नेबाबू गेनू सागर-डिंभे धरणातील (ता.आंबेगाव) पाणी बोगदयाद्वारे पळून नेण्याचा आमदार रोहित पवार यांचा प्रयत्न आहे.पाणी पळवून नेल्यास या भागात पुन्हा दुष्काळी परस्थिती निर्माण होईल. त्यामुळे या भागातील शेतकऱ्यांचे हक्काचे पाणी पळवून नेण्यास शेतकऱ्यांप्रमाणेच सहकारमंत्री दिलीप वळसे पाटील व माझा विरोध आहे. असे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या निदर्शनास आणून दिले. या भागातील शेतकऱ्यांवर अन्याय होऊ देणार नाही. अशी ग्वाही मुख्यमंत्र्यांनी दिली आहे. असे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी सांगितले.

## लांडेवाडी निघोटवाडी येथे जरांगे पाटील यांचे जोरदार स्वागत

**मंचर । प्रतिनिधी**

आंबेगाव तालुक्यात लांडेवाडी, निघोटवाडी- मंचर फाटा येथे सोमवारी (ता.२) संध्याकाळीमराठा समाजाचे मराठा क्रांती योध्दा मनोज जरांगे पाटील यांचे जंगी स्वागत करण्यात आले.



लांडेवाडी येथे माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील,मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष अंकुशराव लांडे, लांडेवाडी गावच्यासरपंच संगीता शेवाळे, सुनील बाणखेले, रवींद्र करंज खेले,तान्हाजी शेवाळे,जानकू पानसरे, खंडेराव आढळराव, रामदास आढळराव, आदी मान्यवरांनी व गावकऱ्यांनी जोरदार स्वागत केले. यावेळी जरांगे पाटील यांनी छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी उपस्थित जनसमुदायानेजय भवानी जय शिवाजी, एक मराठा लाख मराठा अशा घोषणा दिल्या.

निघोटवाडी- मंचर फाट्यावर उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेना पक्षाच्या तालुकाप्रमुख सुरेखा अनिल निघोट, माजी सरपंच निशा निघोट, उषा चिंचपुरे, शामराव निघोट, गणेश राव खानदेशी, प्रा अनिल निघोट यांच्यासह अनेक मान्यवरांनी जरांगे पाटील यांचे फटाक्याची अताशबाजी, ढोल ताशा व घोषणाबाजी करून जोरात स्वागत केले . यावेळी जरांगे पाटील यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करण्यात आला.जरांगे पाटील यांच्या सुरू असलेल्या मराठा आरक्षणाला शुभेच्छा देण्यासाठी युवक युवतीप्रमाणेच ज्येष्ठ नागरिकही उपस्थित होते.